[ काव्येतिहास-संग्रह ]

१४.

रघुनाथ यादव विरचित

# पाणिपतची बखर.

ही

अनेक प्रतींवरून शुद्ध करून अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या

विपुल टीपांसह

काशिनाथ नारायण साने, बी. ए. (डेक्कन कॉलेज.)

यांणीं

प्रकाशित केली.

" संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते."

भगवद्गीता—२.

शालिवाहन शके १८०७ ——राज्याभिषेक शके २११.

श्री

महाराष्ट्राच्या भाषेचा व इतिहासाचा आस्थापूर्वक

अभ्यास करूं इच्छिणाऱ्या सज्जनांस

हा ग्रंथ

परम प्रेमपूर्वक अर्पण करितों.

ग्रंथप्रकाशक.

# पाणिपतची बखर.

# उपोद्घात.

---

पाणिपत हें नांव कानीं आलें किंवा त्याची आठवण झाली कीं, मनाची चमत्कारिक स्थिति होते. दुःख व अभिमान दोन्हीही जागृत होतात. अभिमान अशासाठीं कीं, ह्या घनघोर युद्धाच्या प्रसंगीं आम्हां मराठ्यांनीं शौर्य, धारिष्ट दृढनिश्चय, राजनिष्ठा, इत्यादि जे गुण आपल्या अंगीं दाखविले, ते मनांत येऊन आम्हांस मोठें भूषण वाटतें. दुःख अशासाठीं कीं, कृत प्रयत्न सर्व व्यर्थ होऊन शेवटीं आमचा पराजय व सर्वस्वनाश झाला, आणि ह्या युद्धांत जय प्राप्त झाला असता तर त्यापासून जें वैभव व सार्वभौमत्व प्राप्त झालें असतें, त्यांस आम्ही अंतरलों. ह्या युद्धाच्या कथा वाचून तर आपली स्थिति याहूनही चमत्कारिक होते. अपजयामुळें व सर्वस्वहानीमुळें कितीही वाईट वाटो, ह्या युद्धाचें वृत्त वाचल्यावर कितीही दुःखाचे उसासे येवोत, पुनः पुनः ती युद्धकथा व ते भारती पराक्रम वाचण्यास आपण उत्सुक होतों. आपलें चित्त वेधून जातें. मनाची तंद्री तिकडे लागते. अभिमन्युवत् शरसंधान करणारा विश्वासराय, धृष्टद्युम्नतुल्य खड्गपटु जनकोजी शिंदा, भीमार्जुनसम एक बाजू संभाळणारा युद्धकुशल यशवंतराव पवार, घटोत्कचाच्या पर्वतवृष्टीप्रमाणें लोहगोलांची वृष्टि करणारा इब्राहिमखान गारदी, अश्वत्थामा कृपाचार्यासारखे मेहेंदळे व विंचूरकर, द्रोणाचार्यासारखे वृद्ध मल्हारराव होळकर, सुयोधनाप्रमाणें मानधनाग्रणी, व आकाश कोसळलें असतांही न डगमगणाऱ्या सत्यप्रतिज्ञ कर्णाच्या तोलाचे रणधीर सदाशिवराव भाऊ प्रभृति मंडळींचें कडोविकडीचें धारिष्ट व पराक्रम यांचें वर्णन वाचतांना वांचकाचें लय तिकडेच लागतें. आपण त्या प्रसंगीं तेथेंच आहों असा, तसें प्रत्यक्ष नसतांही, भास होतो. वर्णनाप्रमाणें वाचकाचे मनोभाव होऊं लागतात. सड्या स्वाऱ्या करून मोकळे राहून गनीमी काव्यानें शत्रूंशीं लढाई करावी असें प्रथम सांगितलें असतां, व पुढें शत्रूकडून तहाचें बोलणें आलें तेव्हां "भाऊसाहेब, तूर्त तह करावा पुढें गिलच्यास पाहून घेतां येईल," अशी सल्ला दिली असतां, भाऊसाहेबांनीं दुराग्रहानें तें कांहीं ऐकिलें नाहीं, हें वाचून आपणांस भीष्मद्रोणादिकांच्या उपदेशाचें व शकुनीनें भारलेल्या हटवादी सुयोधनाचें स्मरण होऊन खेद होतो; विश्वासराव याचें आकस्मिक पतन पाहून अभिमन्यूच्या अकालिक मरणाप्रमाणें वाईट वाटतें;

जनकोजी शिंदा ज्यास देशीं परत जा असें सांगितलें असतां "स्वामींचें पादत्राण पडेल तेथें माझें शीर पडेल" असें म्हणून जो भाऊंच्या परिणामाचा वांटेकरी झाला, त्याजवरील शेवटील प्रसंग वाचून अंतःकरण पिळून जातें. युद्ध नायकांच्या उठावणी बरोबर वाचकाच्या मनाचीही उठावणी होते, त्यांनीं माघारें घेतलें कीं वाचकाचें मनही माघारें घेतें, त्यांच्या आशेबरोबर यास आशा उत्पन्न होते, त्यांची नाउमेद झालेली पाहून याचीही नाउमेद होते; असा कांहीं ह्या शोकरसावसानी युद्धचरित्राचा भयानकरूपी तर खराच, पण मोठा मोहक कथाभाग आहे.

२. असो, अशा ह्या महायुद्धाचीं वृत्तें आपल्या लोकांनीं निरनिराळीं लिहून ठेविलेलीं आढळतात. तीं सर्व पृथक् पृथक् वाचलीं असतां पूर्वोक्त प्रकारें चित्ताचें रंजन होऊन रचणारे भिन्न भिन्न असल्यामुळें भिन्न भिन्न प्रकारची रचना व कोठ कोठें मूळ कथेंत फरकही दृष्टीस पडतात. याजकरितां हे सर्व ग्रंथ यथावकाश प्रकाशित करण्याचें आम्हीं योजिलें आहे. भाऊसाहेबांची बखर म्हणून जो ग्रंथ आम्हीं मागें ह्या पुस्तकांत प्रकाशित केला, त्यांत तर इसवी सन १७५२ पासून तो सन १७६१ पर्यंत हिंदुस्थानांत मराठ्यांनीं ज्या मोहिमा केल्या त्या सर्वांचें वर्णन आहे. अंताजी माणकेश्वर हे सरदार हिंदुस्थानांतील कारभारांचे वाकबगार असून शेवटच्या लढाईंतही होते. त्यांनीं या युद्धाची आरंभापासून सर्व हकीकत लिहिलेली आहे. ह्या प्रकारणाच्या दोन चार प्रती आम्हांस मिळाल्या आहेत. मल्हारराव होळकर यांणीं पेशवे सरकारास या युद्धाची, किंबहुना या मोहिमेची, अव्वल अखेर सविस्तर माहिती लिहून कळविली ती "होळकराची थैली" ह्या नांवानें सुप्रसिद्ध आहे. ह्या होळकराच्या थैलीची प्रत आम्हांस अद्याप उपलब्ध झाली नाहीं. दुसरी एक बखर मोरो हरी या नांवाच्या गृहस्थास नारो सखाराम यांनीं लिहिलेली आहे. हिच्या कांहीं प्रती आम्हांकडे आलेल्या आहेत. मोरो हरी व नारो सखाराम या नांवांचे कोणी पुरुष खरोखर होऊन गेले, किंवा बखर लिहिण्याच्या पद्धतीप्रमाणें लिहिणारानें ह्या दोन व्यक्ति कल्पून बखर लिहिण्यास आरंभ केला, हें समजण्यास आम्हांस मार्ग नाहीं. रघुनाथ यादव, दिमत चिटणीस पेशवे यांचे, यांनीं ही श्रीमंत गोपिकाबाई साहेब, श्रीमंत नानासाहेब यांचें कुटुंब, यांच्या सांगण्यावरून ह्या युद्धाची एक बखर लिहिली. अशा ह्या युद्धाच्या नानाप्रकारच्या बखरी लिहिल्या गेल्या. ह्यांपैकीं ह्यांतील शेवटली म्हणजे रघुनाथ यादव यांनीं रचलेली हिचें प्रकाशन करण्यास आम्ही आज आरंभ करितों.

आतां कोणी म्हणेल कीं, एकदां पाणिपतच्या युद्धाची हकीकत भाऊसाहे-

बांच्या बखरींत आली असतां पुनः तीं कां छापावी ? या प्रश्नाचें उत्तर आम्हीं अंशतः वरतीं दिलें आहेच कीं, ग्रंथा ग्रंथामध्यें इतिहाससंबंधें कांहीं फरक असतात, सबब ते सर्व प्रसिद्ध झाले असतां भावी इतिहासकार यांस फार उपयोगीं पडतील. परंतु, ह्या शिवाय भाषेच्या संबंधें पहातां अशा प्रकारे सर्व ग्रंथ जसेच्या तसेच प्रसिद्ध व्हावे, हें फार इष्ट आहे. एका ग्रंथकाराची भाषा दुसऱ्या ग्रंथकाराच्या भाषेशीं जमत नाहीं. एकाची शैली एका प्रकारची, दुसऱ्याची दुसऱ्या प्रकारची. भाऊसाहेबांच्या बखरीच्या भाषेंत आणि पेशव्यांच्या बखरीच्या भाषेंत फार तफावत आहे. तसेंच पेशवे यांच्या शकावलीची भाषा, व साताऱ्च्या महाराजांचीं चरित्रें प्रसिद्ध होत आहेत त्यांची भाषा, यांतही फरक आहे, असें थोडेंसें सूक्ष्म रीतीनें पाहिलें असतां ध्यानांत येईल. आमच्या ह्या पुस्तकाचा उद्देश नुसतीं इतिहासाचीं साधनें असतील तेवढींच प्रसिद्ध करावीं, असा नाहीं. फक्त असाच उद्देश असता, तर बखरींतील ऐतिहासिक गोष्टींचीं टिपणें करून डफ साहेबांच्या ग्रंथाशीं जेथें विरोध येईल तीं स्थळें दाखविलीं असतीं, म्हणजे कदाचित् बस झालें असतें. सर्व ग्रंथचेग्रंथ छापण्यास नको होते. पण मराठी भाषेंत लिहिलेले जुने गद्य ग्रंथ, ज्यांच्या अस्तित्वाविषयीं माहिती नसल्यामुळें स्वर्गवासी रा० ब० दादोबा पांडुरंगांसारखे महाराष्ट्रभाषाभक्त शोधक पुरुष हळ हळ करीत, असे बाहेर जगा पुढें यावे, व जुन्या महाराष्ट्र ग्रंथकारांचा उद्धार होऊन मराठी भाषेची एके प्रकारची उणीव नाहींशी व्हावी, हाही ह्या पुस्तकाचा हेतु आहे. काव्येतिहास–संग्रहाच्या ऐतिहासिक भागाचा उपोद्घात प्रथम वर्षाच्या प्रथम अंकांत आला आहे तो वाचिला असतां ह्या गोष्टीची चांगली फोड होईल. सारांश हे दोन्ही हेतु

* तथापि इतिहास हा मोठा व्यापक विषय आहे, त्यास हेंही बस होणार नाहीं. लोकांचे आचार विचार, धर्म, नीति, रीतीभाती, सामाजिक समारंभ, विद्या व कला यांचा उदय किंवा ऱ्हास, थोर पुरुषाचे स्वभाव, इत्यादि ज्या अनेक उपयुक्त गोष्टी त्यांचें खरें स्वरूप नुसत्या टिपणांनीं कधींही मनावर नीट बिंबावयाचें नाहीं. त्याला त्या त्या देशच्या व त्या त्या काळच्या लोकांनीं लिहिलेलीं सविस्तर वर्णनेंच पाहिजेत. या संबंधें येथें फार पाल्हाळ न लावितां एक दोन उदाहरणें देऊं म्हणजे पुरे. कांहीं कांही ग्रंथांत शिवाजी महाराजांस राज्याभिषेक मोठ्या समारंभानें झाला, किंवा सवाई माधवराव यांचें लग्न मोठ्या कडाक्याचें झालें, असें लिहिलेलें आढळतें. पण अशा तुटपुंजा टिपणांवरून मनावर विशेष ग्रह होत नाहीं. तींच चिटणिसांच्या शिव छत्रपतीच्या सप्तप्रकरणात्मक चरित्रांत व पेशव्यांच्या बखरींत ह्या दोन समारंभांचीं वर्णनें वाचलीं म्हणजे मन दंग होऊन त्या त्या राज पुरुषांच्या वैभवाचें व सत्तेचें खरें स्वरूप कळून येतें व लोकाचाराचेंही अनेक प्रकार नजरेस येतात.

ध्यानांत घेतले म्हणजे ह्या युद्धाची ही दुसरी बखर छापण्यास सुरू केली ह्या बद्दल कोणी आम्हांस दोष देणार नाहीं.

३. ह्या बखरीविषयीं व आम्हांस उपलब्ध असलेल्या प्रतींविषयीं कांहीं माहिती देणें इष्ट आहे ती देऊन नंतर मूळ ग्रंथास आरंभ करूं.

वर लिहिलेंच आहे कीं, ही बखर श्रीमंत गोपिकाबाईसाहेब यांजकरितां चिटणिशीकडील रघुनाथ यादव यांनीं रचिली. ग्रंथकारानें ग्रंथरचना करण्यास आधार कोणते लेख घेतले, व ही बखर कधीं लिहिली, याजबद्दल त्यानेंच बखरीच्या शेवटीं लिहिलें आहे कीं, "एक बारसनीस शत्रूकडील व [ एक ] श्रीमंतांकडील या उभयतांचे दिनचर्येचें वर्तमान दफात्यास चिटणिसांनीं बार केलें, त्यांचीं संगत पाहून कच्चा मजकूर सेवेशीं निवेदन करण्याकरितां यथामतीनें बखर सजवून सेवेशीं पाठविली आहे. शके १६८४ चित्रभानुनाम संवत्सरे, माहे फाल्गुन शुद्ध ५ पंचमी मंदवासर मुक्काम पुणें." पाणिपत येथील युद्ध शके १६८२ पौषमासीं झालें आणि ही बखर शके १६८४ फाल्गुनमासीं लिहिली, म्हणजे युद्ध झाल्यानंतर सुमारें दोन वर्षें दोन महिन्यांनीं ही बखर लिहिली गेली, यावरून व चिटणिसांचें दफातें ग्रंथकारास आधारभूत झालें यावरून, लिहिलेली हकीकत विश्वसनीय आहे असें ह्मणण्यास बाध येत नाहीं. बखर रचणार रघुनाथ यादव यांजविषयीं माहिती वर लिहिल्याशिवाय अधिक मिळाली नाहीं.

(अ) ह्या बखरीची पहिली प्रत पुणें येथील राजश्री शंकर तुकाराम शाळिग्राम यांच्या मार्फत मिळाली. ही खर्चीं उभ्या बंदांवर लिहिलेली आहे. अक्षर चांगलें आहे. आम्हीं प्रत केल्यावर लागलीच शाळिग्राम यांनीं आपली प्रत आम्हांकडून परत नेली, त्यामुळें तिजविषयीं विशेष हकीकत येथें देतां येत नाहीं.

(आ) दुसरी प्रत भिंवडी येथील एका गृहस्थानें आम्हांकडे पाठविली. ही जुन्नरी कागदांच्या चौरस बंदांवर दोन्ही बाजूंनीं बुकासारखी वही बांधून त्याजवर लिहिली आहे. हिच्या पहिल्या बंदाचें डावें अर्धे गेलें असल्यामुळें व उजवें जीर्ण झाल्यामुळें पहिलीं दोन पृष्ठें नाहींत, असेंच ह्मणावयाचें. दोन पृष्ठांचा एक बंद, याप्रमाणें एकेचाळीसाव्या बंदावर म्हणजे ८१ व्या पृष्ठावर ही बखर समाप्त झाली आहे. ८२ व्या पृष्ठापासून श्रीमंत सवाई माधवराव पेशवे, याजकरितां शककर्ते शिवाजी महाराज यांच्या अव्वलीपासून लिहिलेली बखर आहे. ती सवाई माधवराव यांच्या लग्नापर्यंत आणून संपविली आहे असें दिसतें. शेवटील कांहीं बंद गहाळ जाहलेले आहेत. ह्या प्रतीचें अक्षर वा-

टोलें, वळणदार, व सुवाच्य लिहिलेलें आहे. पृष्ठांचीं लांबी रुंदी फूट फूट असून प्रत्येक पृष्ठावर अकरा ओळी लिहिलेल्या आहेत. वही सुटून बंद निरनिराळे व बरेच जीर्ण झालेले आहेत, तरी अक्षरें शाबूद आहेत. 'कृष्णाजी त्रिंबक जोगळेकर' असें नांव प्रथम पृष्ठाच्या जीर्ण झालेल्या उजव्या अर्धावर दोनदां घातलेलें आहे. शेवटीं "ही किताबत महंमद इब्राइम वल्लद बापूसाहेब कबे सुभेदार वस्ती कसबे ठाणें तारीख १२ माहे मे सन १८२४ ता० १२ माहे रमजान शरीफ सन १२३९ हिजरी शके १७४६ तारणनाम संवत्सरे वैशाख वद्य १ प्रतिपदा बुधवार दिवसाचे अकरा वरावर समाप्त केली. हस्ताक्षर गोपाळराव बल्लाळ गद्रे वसईकर हल्लीं वस्ती कसबे ठाणें" असा लेख आहे. यावरून ही प्रत लिहून साठ वर्षें होऊन गेलीं, व मूळ मालकापासून ती जोगळेकर यांजकडे मागाहून आली, असें होतें. प्रत करणारानें प्रत कोठल्या प्रतीवरून केली तें लिहिलें असतें तर बरें झालें असतें. ह्या प्रतीचा आम्हांस उपयोग फार झाला. ह्या ठाणे प्रतीचा व वरील पुणे प्रतीचा मेळ सर्वांशीं जमतो, असें ताडून पाहतां दिसोन आलें. व आम्ही ह्या दोन प्रतींवरूनच मुख्यतः पुढील बखर छापण्याचें योजिलें आहे.

(इ) तिसरी प्रत रा० रा० वामनराव दाजी ओक यांनीं नागपुराहून बाळबोध प्रत करून पाठविली ती. तिच्यावर मूळ बखरीचा शक १६८३ वृषानाम संवत्सर असा दिला आहे. मिती फाल्गुन शुद्ध १५ पौर्णिमा आहे. यावरून तर युद्ध झाल्यावर १ वर्ष २ महिन्यांनींच ही रचिली असें होतें. "ही नकलेची नकल श्रावण शुद्ध ५ पंचमी शके ११९४ [ ! ] आनंदनाम संवत्सरे मुक्काम पुणें" येथें केली, असें शेवटीं लिहिलें आहे. ह्यावरून प्रत कधीं केली ह्याचा निर्णय होत नाहीं. नकल करणारा श्रीधर गणेश परांजपे. ह्या नागपूर प्रतींत व वरील पुणें आणि ठाणें प्रतींत मजकूर जरी शेवटपर्यंत एकच आहे, तथापि नागपूर प्रतींत पुष्कळ ठिकाणीं शब्द व वाक्यें ज्यास्त आढळतात. ज्या प्रतीवरून राजश्री ओक यांनीं आह्मांकरितां ही प्रत केली, ती आह्मांकडे न आल्यामुळें तिच्या स्वरूपाबद्दल कांहीं लिहितां येत नाहीं. तथापि ती बरी लिहिली असावी असें वाटतें.

(ई) पुणें येथें बाजारांत आम्हीं एक प्रत विकत घेतली ही चौथी प्रत. हिच्या प्रथम पृष्ठावर श्रीकाराच्या डाव्या कोपऱ्यावर 'सखाराम मोरेश्वर वझे दस्तुर खुद्द' असें नांव आहे. हिचे साठ पांसष्ट बंद असावे, पैकीं साडेअठेचाळीस बंद आम्हांस मिळाले. ही प्रत करणारास मूळ प्रतीचें अक्षर पुष्कळ ठिकाणीं लागलें नाहीं असें दिसतें. हिचे खर्ची बंद उभे दोन फूट लांब व चार इंच

रुंद असे आहेत. अक्षर बरें आहे. ही बंदाच्या एका बाजूनें लिहिलेली आहे. हिचे शेवटले बंद नसल्यामुळें ही कोणी कधीं व कोठल्या प्रतीवरून लिहिली हें कळण्यास मार्ग नाहीं. हिचा व वरील नागपूर प्रतीचा बराच मेळ पडतो.

४. ही बखर छापण्यास तयार करण्याच्या कामांत आमचे स्नेही रावसाहेब दामोदर गोविंद घारपुरे, बी. ए. सबजज्ज यावल यांनीं जी पुष्कळ मदत केली, तिजबद्दल त्यांचे आभार मानून आम्ही मूळ ग्रंथास आरंभ करितों.

रघुनाथ यादवकृत

# पाणिपतची बखर.

॥ श्रीगणपती प्रसन्न. ॥

श्रीमंत महाराज मातोश्री गोपिकाबाई साहेब मुक्काम शहर पुणें साहेबांचे सेवेशीं.

आज्ञाधारक रघुनाथ यादव लेखक दिम्मतें चिटणीसें कृतानेक साष्टांग दंडवत. विज्ञापना तागाइत छ २५ नमादिलाखर पावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. नवी खबर श्रीमंत यांजकडून वर्तमान आजपर्यंत झालें तें विदित व्हावें म्हणून आज्ञाधारकास आज्ञा जहाली. त्यास यथामतीनें निवेदन करितों. श्रवण केलें पाहिजे.

यथापूर्व कथन. श्रीमंत महाराज राजश्री शाहू महाराज छत्रपति यांणीं निजधामास जाते समयीं राजश्री नानासाहेबांस व भाऊसाहेबांस सातारियाचे मुक्कामीं समक्ष बोलावून आणून, सर्व निरवानिरव करून, शिक्के कटार हवालीं करून, मस्तकीं वरदहस्त ठेविला. आणि आज्ञा जहाली जे "माझे मागें सकल पृथ्वीचें राज्य करणें तें तुम्हांशिवाय राज्यास धणी कोणी दिसत नाहीं." असें सांगून महाराज कैलासभुवनास गेले. मागें राजश्री नानासाहेब व भाऊसाहेब यांणीं आपल्या पराक्रमानें अटकेपर्यंत मुलुख काबीज केला. बारा वर्षें सकल

---

१. 'गोपिका' हा शब्द प्र० ४ मध्यें नाहीं.
गोपिकाबाई ही रास्त्यांची मुलगी.

२. दिमत=ताबा.

३. चिटणीस पेशव्यांचे. यांचे मूळ पुरुष निळो बल्लाळ; खंडो बल्लाळ, महाराजांचे चिटणीस, यांचे बंधु.

४. 'दंडवत' असें लिहिलें आहे या वरून रघुनाथ यादव हे परभू होते असें दिसतें.

५. मार्गशीर्ष वद्य ३ शुक्रवार शके १६७१, शाहू महाराजांचें चरित्र. पण पेशव्यांचे शकावलींत "मार्गशीर्ष शुद्ध १स देहविसर्जन झालें" असें आहे.

६. "राजश्री नानासाहेब व भाऊसाहेब हे त्या ठिकाणींच होते ते समयीं नानांस समीप बोलावून आणिलें आणि गळ्यांत शिक्के घातले आणि—" असा पाठ प्र० ४ हिचा आहे. एवंच भाऊही सातारां होते असा भाव सर्व प्रतींचा होतोच—पण भाऊ या वेळीं पुण्यास होते असें इतरत्र आढळतें. नाना भाऊंचें परस्पर प्रेम फार, तेव्हां जेथें नाना तेथें भाऊही असावे असें बखर रचणारास वाटून ते सातार्‍यास होते असें म्हटलें आहेसें दिसतें.

७. हे शब्द प्र० ४ मध्यें अधिक आहेत.

८. 'त्यांचे शिक्यावर' प्र० ४.

९. मूळांत 'काबील' असें आहे.
काबील=हुशार, योग्य.

पृथ्वीचें राज्य केलें. राज्याचा उदय[१०] दिवसें दिवस होत चालला. सर्व जग प्रांतांतील[११] किल्ले कोट व महादुर्गें सोडविलीं. एक सत्तेनें[१२] मांडलिक राजे सेवक होऊन दास्यत्व करूं लागले. असा पराक्रम थोर सर्वांविशेष[१३] जाहला असतां त्यास पुढें होणारें भविष्यें बलवंत, याजकरितां राजश्री नानासाहेबांस बुद्धि जहाली जे, राजश्री भाऊसाहेबांस हिंदुस्थानांत फौज देऊन रवांना[१४] करावें. ते समयीं राजश्री महादाजीपंत पुरंधरे यांहीं श्रीमंत महाराज यांस विनंती केली कीं, "भाऊसाहेबांस एकंदर[१५] हिंदुस्थानचे मोहिमेस पाठवूं नये. भाऊसाहेबांचे कारभाराचा हावभाव दुसरे कोणास येणार नाहीं. सर्व राज्याचा भार त्यांजवर[१६] आहे." असें कित्येक प्रकारें सांगितलें. ते समयीं श्रीमंत राजश्री नानासाहेब यांणीं उत्तर केलें कीं, " भाऊसाहेबांचे चित्तांत स्वारीस जाण्याचें आहे याजकरितां त्यांस पाठवितों. त्यांचाही मानस फार दिवस आहे. याजकरितां येविशीं[१७] स्वारी करून आले म्हणजे सर्वांची खातरजमा[१८] होईल." तेव्हां महादाजीपंत पुरंधरे यांणीं उत्तर केलें कीं, " कैलासवासी चिमाजी आपा यांणीं पूर्वीं बहुत पराक्रम केला, त्यांचे चिरंजीव[१९] भाऊसाहेब हे लढाईस मागें हटणार नाहींत. शत्रूस पराभवितील किंवा आपण कैलासवासी होतील. त्यांत सहसा अन्यथा नाहीं. याजकरितां त्यांस सहसा पाठवूं नये." ते समयीं सौभाग्यवती गोपिकाबाई साहेब यांणीं अनुमोदन दिलें कीं, त्यांस[२०] रवाना केलें पाहिजे. सबब दृढ निश्चय करून, मागील पराक्रम मनांत आणून, पुढेंही रूमशाम येथें स्वराज्य[२१] करणें हीच उमेद भाऊसाहेबांचेही मनांत आहे, दुसरा निजध्यास नाहीं; इराणीही अटकेपार होता तो अटक नदी उतरून आलीकडे आला, त्यास अटकेपार घालवावा या कारणास्तव राजश्री सदाशिवपंत भाऊ व चिरंजीव विश्वासराव साहेब यांची रवानगी केली पाहिजे, अशी मसलत करून समागमें प्रमुख सरदार नामांकित

---

१०. 'उपाय' असें कांहीं प्रतींत आढळतें. तो अर्थात् लेखकप्रमाद आहे.

११. 'सर्व राज्य जगत्रांतील' प्र० ४.

१२. "एक सत्ता केली. मांडलिक०" प्र० ४.

१३. 'लोक' असा कांहीं प्रतींचा पाठ आहे.

१४. ह्या विषयीं निरनिराळे ठिकाणीं निरनिराळे लेख आहेत. नानांच्या मनांत भाऊं विषयीं वाईट आलें होतें असा या बखरीचा आशय आहे.

१५. एकंदर=बिलकुल, कधींहो.

१६. ही गोष्ठ तर खरीच—पुरंदऱ्यांप्रमाणें मल्हारराव होळकर याचेंही मत असेंच होतें. भाऊसाहेबांची बखर पृ० ११ पहा.

१७. 'व त्यांजला गर्वही झाला आहे. यास्तव येवढी०' प्र० ४.

१८. 'खातरी' प्र० ४.

१९. येथपासून प्र. ३ ही उपलब्ध आहे.

२०. 'त्यांसच' प्र० ४.

२१. 'स्वस्थता' प्र० ४.

देऊन हिंदुस्थान प्रांतीं रवानगी केली. त्यांची नांवनिसी बितपसील असामीः —

| | | |
|---|---|---|
| १ मल्हारजी होळकर. | १ रामराव खंडोजी देवकांते. | १ नारायणराव मोहिते. |
| १ जनकोजी शिंदे. | १ सिधोजी कामरे. | १ देवजी शिवनेरे. |
| १ दमाजी गायकवाड. | १ सयाजी ठोंनगे[25]. | १ बळवंतराव गणपत. |
| १ यशवंतराव पवार. | १ गोपाळराव[26]. | १ शामराव गणेश. |
| १ समशेर बहादर. | १ गोविंदपंत बुंदेले. | १ आनंदराव पवार. |
| १ त्रिंबकराव सदाशिव. | १ सुलतानराव[27]. | १ लिंगोजी नारायण. |
| १ नाना पुरंधरे. | १ हणमंतराव सोनवर्णेकर. | १ नरसिंगराव बांडे |
| १ सोनाजी भापकर. | १ रघुनायजीबावा. | १ मानसिंगराव बांडे[31]. |
| १ विठ्ठल शिवदेव. | १ बहिरजी शेंडगे. | १ बळवंतराव विनायक. |
| १ उमाजी माहोरेणे[22]. | १ गोविंदपंत. | १ विसाजी महारुद्र. |
| १ तुकोजी पवार[23]. | १ अपाजी जाधवराव. | १ बाजे* लोक. |
| | १ संताजी आंटोळे. | १ हुजरात. |
| ११ | १२ | १२ |

३५.

सदर्हूप्रमाणें[32] नामांकित बरोबर सरदार व या खेरीज चाळीस हजार धारकरी शिवाय सरदार, याप्रमाणें फौजेचा जमाव करून रवानगी केली. गंगापार[33] होतांच नबाबांनीं कटकट काढली. त्याचें पारिपत्य[34] करून चवसष्ट लक्षांचा मुलुख[35] सोडवून[36] पुढें नर्मदेपार गेले. तों फौजेचा तळ उज्जनी पावेतों पडत चालला. त्या प्रांतींचे जे जे सरदार व अप्पाजी-राव व अंताजी माणकेश्वर

२२. 'महार्णव' प्र० ४. मराठ्यांत दोन्ही आडनांवें आढळतात.

२३. 'तुकोजी होळकर यांचे पुत्र' प्र० ३.

२४. 'पोवार' प्र० ४.

२५. 'वानगे' प्र० १ 'वाघ' प्र० ४.

२६. 'बुधले' हें आडनांव प्र० ४ खेरीज दुसऱ्या प्रती देत नाहींत, दुसरें 'गोपाळराव' असेंच त्यांत आहे.

२७. 'सुलतानजी निंबाळकर' प्र० ३. 'येसूजी निंबाळकर' प्र० ४.

२८. 'सालवेकर' प्र० ३ व ४. 'सानवलकर' प्र० १.

२९. 'सडगे' प्र० १. 'शेटगे' प्र० ३.

३०. 'आठवले' प्र० १ व २.

३१. 'मानसिंग' प्र० १ मध्यें नाहीं.

* बाजेलोक=कांहीं इसम, दुसरे लोक.

३२. याशिवाय प्र० ४ मध्यें नांवें आहेत तीं नागोजी रणदिवे, रामचंद्र नरहर, शिवाजी गंगाधर, गोपाळ गणेश.

३३. गंगा=गोदा.

३४. 'त्याशीं युद्ध' प्र० ४.

३५. '० ची जहागीर' प्र० ३.

३६. हा मुलुख उदगीर येथें १७६० सालीं मोंगलांचा मोड करून भाऊंनीं घेतला होता.

वगैरे पैतके होते ते येऊन भेटले. संपत्ति, दौरा, मित्र, भावें करून अनुकूळ जहाले. वरचेवर आला स्वार घोडाराउत, ठेवीत चालले. क्षिप्रापार होऊन मजल दरमजल पुढें चालले. हजिरी गणतीस एकंदर लहान थोर सरदार मिळून साडे तीन लक्ष घोडेराऊत जमले. या खेरीज पायदळ साठ हजार. ऐसा एकंदर जमाव जाट व मराठे आदि करून सव्वा चार लक्ष फौज गणतीस लागली. राजश्री मल्हाराव होळकर यांचा तोफखाना जरबा सुमारें ३०० तीनशे व सरकारी तोफखाना बरोबरचा सुमारें ४००. या खेरीज उज्जनींतील व पायगडांतील व झांसींतील व नरवरांतील मिळोन सुमारें ५०० पांचशें. ऐसा तोफखाना जरबा सुमारें १२०० बाराशें. या खेरीज जेजाला व सुतरनाला फूट मढिया एकूण आवाज दोन हजार व बाणाच्या कैच्या सुमारें ४०,००० चाळिस हजार. शिवाय दारू गोळा. पुरें सामान शिलेपोस करून शहाण्णव कुळींचे मराठे जमा करून, अंगीं ज्यांच्या मर्दुमी, समशेरबहादुर रणपंडित, याजप्रमाणें फौजेचा बंदोबस्त करून दिल्लीचे सुमारें सदाशिवपंत परम आनंदे करून हर्षभरित चालले. अंतरवेदीपासून तहत बंगाला आदि करून बादशाहीगिरीची पेशजीचा खालीसा अंमल मुलख मारून दक्षण राज्य केलें. इतुक्या लष्करास खर्चास व दाणा वैरणीस कांहीं मुलुकांत बाकी राहिली नाहीं. सात आठ गांवचा नागा मुक्कामास पाहिजे. सेनासागर दिवसेंदिवस अधिक उचंबळत चालला. पुढें जाट आदिकरून जे जे भुंमे त्या प्रांतींचे होते तितके अनुकूळ जहाले. चोहोंकडील फौजा मिळोन यमुनातटाकास सदाशिवपंत भाऊ दाखल जहाले.

बुंधेलखंड व बंगाला येथील रजपूत यांनीं व मांडलिक राजे यांणीं आप-

---

१७. पथके–सुमारें १०० स्वारांचें एक पथक, त्यावरील सरदार तो पथक्या.

१८. ‘सर्व संगतीदार’ प्र० ४.

१९. ‘आणिक [किंवा] आणिला स्वार उत्तम घोडेराऊत’ असाही पाठ आहे.

४०. ‘मोजला’ प्र० ४.

४१. ‘जरबा’ ? तोफांचा प्रकार आहे किंवा ‘नग’ ‘डाग’ या अर्थी ! ‘जरब’ असें घेतलें तर अर्थाची विसंगत होत नाहीं. तथापि मिळालेल्या दोन्ही ही चांगल्या प्रतींत ‘जरबा’ असें स्पष्ट आहे.

४२. ‘हाडमार’ प्र० ३ ‘मोठा’ प्र० ४.

४३. सुतर=शुतर. शुतरनाला=उंटावरील मांडीं, तोफा.

४४. ‘फूठमढिया’ प्र० २. ‘फटमढलिया’ प्र० १. ‘फटकडिया’ प्र० ३|४.

४५. शिलेपोस=(कवच-सुगोपित)तयार.

४६. या पुढें ‘रणधुरंधर, रणशूर’ असें प्र० ३ मध्यें आहे.

४७. ‘तवेशें’=त्वेषें प्र० ४.

४८. ‘बादशाहीगिर्द’ ‘°जिरी°’ पाठ.

४९. प्र० १ व २ ‘लष्करास व खर्चास.’

५०. भुमे=त्या भूमीवरील, त्या देशाचे राहणारे, माहितगार.

ूर यांचा व जाटांचा उपमर्द करावा हा दढोत्तर[६३] विचार करून वकिलाब- गुर्मीचें बोलणें सांगून पाठविलें. तदनंतर सुजात दौले व मनसूर या उभयतांनीं आपले वकिलाबरोबर सांगून पाठविलें कीं, " रजपूत व : दिल्लीपत बादशाही चाकर असतां त्या बादशहाबरोबर बदमस्ती करि- , त्यांसही जरब देऊन व तुम्हीही बंडे [ करून ] दरवर्षीं या प्रांतीं येऊन शाही बळजोरीनें कायम करूं पहातां, येविशीं तुह्मांस इजा द्यावी हा मतलब मचा आहे. या परता दुसरा मतलब आमचा कांहीं एक नाहीं. " याप्रमाणें पल्या वकिलाबरोबर भाऊसाहेबांकडे सांगून पाठविलें आणि आपण बादशाही- नुमतांत रजपूत राजे व राजवाडे व पठाण वगैरे वागत होते त्यांस फिसात रून आपणास अनुकूल केलें व चितोडकर राणे व उदेपूरकर व अमेरीकर[६४] रामनगरकर व मारवाडकर असे एक मतांत आणून सदाशिवपंतांवर व जाटांवर बदनजर धरिली.

तेव्हां सदाशिवपंत अटीनें फौजेसुद्धां दिल्लीस दाखल जहाले. दिल्लीचा बंदोबस्त उभयतांनीं* करावा हा विचार करून सर्वांची आणभाक क्रिया बेलभंडार घेतले[६५] कीं, इराणीस नेस्तनाबूद करावा. हा सिद्धांत करून जाट जामदार बादशाही सलतान्यांतील[६६] होते त्यांस सांगितलें कीं, " आमच्या सलतान्यास खर्चास पाहिजे सबब बादशाही जामदारखान्यांतून खजीना देववावा. " असें बोलणें पडतांच जाट [ यानें ] चित्तांत समजून उत्तर केलें कीं, " बादशाही खजीना हुकु- माबिगर खर्च करावयाचा नाहीं. तुम्ही लुटावयास सिद्ध जहाले असतां पुढें मागें आम्हांस नामोसी[६७] येईल. " असा घाट बोलण्यांत आणून जाटानें फरजदलीची गोष्ट सांगितली कीं, " आम्ही बादशाही चाकर बहुत दिवसांचे असतां आमचे डोळ्यां देखत ही गोष्ट घडावी ही रीत आम्हां जाट रजपुतांस अनुचित. बादशाही तक्त आमचें आम्हीं रक्षावें. येथें एकनिष्ठपणें वर्तावें. हुकुमाबिगर खजीना फोडावयास दक्षणी बारग्यांची[६८] फौज आली असतां बेलाशक तरवार[६९] चालेल आणि तुमचा आमचा भाईपणा राहणार नाहीं. आम्ही बादशाही पूर्वापार चाकर तुमचें एकंदर[७०] ऐकणार नाहीं. या उपर समजोन रहाणें." अशीं भाषणें नोकेझोकेचीं[७१] जाटांनींही भाऊसाहेबांकडे सांगून

---

६३. दढोत्तर=दढतर, बळकट.

६४. 'अमेलारी' प्र० १. 'अजमीर' प्र० ३. 'अमेदर' प्र० ४.

* उभयतांनीं=जाट व मराठे यांनीं.

६५. 'झाले' प्र० ३.

६६. सलतना=फौज किंवा अंमल.

६७. नामोशी=बदलौकिक, बेअबरू.

६८. बारगे=बेबंद, लुटारू लोक.

६९. तरवार चालेल=आम्हीं मारूं.

७०. एकंदर=बिलकुल.

७१. 'निष्ठुर' प्र० ३ व ४. नोकेझोकेचीं=मनाला लागणारीं, खोंचणारीं.

लाले सैरदेशीं फौजा घेऊन येऊन दोहींकडे अंग न देतां सलुख राखून, संपादून आपआपले स्वस्थलास स्वस्थ राहिले. इराणीस किंवा सदाशिवपंतासही स जहाले नाहींत. तसे अंतरवेदीकर जयसिंग यांणीं आपली फौज दो कुमकेस न देतां आपल्या स्वस्थानावर होते. हस्तनापूरवासी पातशहा बेदनजर धरून, इराणी व आपण एकत्र होऊन, दक्षणी फौजेचा उपमर्द वयाचा विचार आरंभून, मनसूर अल्ली व महमदखान व भोलीभुजसिंग अयोध्येचे यांणीं व सुजात दौले या सर्वांनीं कुमति करून इराणी आणावय संकेत केला.

हा मजकूर तपशीलवार सदाशिवपंतांस कळला. तेव्हां सदाशिवपंतां सुजात दौला याजकडे मातबर माणूस वकिलीस पाठवून बोलणें घातलें की "मागें अबदल्ली इराणी बेइमानी होऊन बादशाहीचा ऱ्हास केला. दिल्लीप बादशाहींत बाकी राहिली नाहीं. व तुम्ही व मनसूर अल्ली मिळोन इराणी घेऊन येतां ही गोष्ट अनुचित, यांत कांहीं ताजकी होतां दिसत नाहीं. इराणी स पेशें होऊं न देतां तुम्हीं व आम्हीं एकत्र होऊन, पेशजीचें उसनें घेऊन अगदीं नेस्तनाबूद करावा. अबदल्ली इराणी मोठ्या उल्हासें मजल दरमजल येतो, त्यास ठायींचे ठायीं ठेविल्यास उत्तम आहे. इराणी यांणीं लाहोर फत्ते केली. बादशाही सिंहासनें मोडित चालिला. असें असतां तुम्हीं इराणीस अंग दिल्हें, हें उत्तम केलें नाहीं." म्हणोन बहुता प्रकारें वकिलांनीं बोध केला. परंतु सुजात दौले यांणीं व मनसूर अल्ली यांणीं स्वहित न पहातां न ऐकतां पेशवे

---

५१. 'सरहद्दीस' प्र० ३. 'सारेदेश' प्र० ४.

५२. बदनजर=वाईट दृष्टि; कुबुद्धि.

५३. मनसूरअल्ली म्हणजे सफदरजंग, सुजा उद्दवला ह्याचा बाप, आणि तो मरून त्याच्या पाठीमागें गादीचा मालक त्याचा मुलगा सुजा हा झाला होता. 'मनसूरअल्ली' असें पुढेंही अनेकदा आलें आहे. पण ही ग्रंथकाराची चुकी आहे. 'नजीबखान रोहिल्या' बद्दल 'मनसूरअल्ली' हें नांव दिलेलें आहे असें दिसतें.

५४. मातबर=थोर, वजनदार.

५५. 'येऊन' प्र० ३ व ४.

५६. 'हाराष' प्र० २. ऱ्हास या शब्दावरूनच 'हाराष' असें झालें व या वरूनच भाऊसाहेबांच्या बखरींत 'गनिमांचा हर्षकाल' असें अनेकदा आलें आहे.

५७. 'तानकी' प्र० ३. 'तेजगी' प्र० ४. ताजकी=सुख, बरें, भलेपणा !

५८. पेश=पुढें, वरचढ.

५९. 'नेस्त' व 'नाबूद' ह्या दोन्ही शब्दांचा अर्थ एकच. तथापि ऊर्दु भाषेंत अशी पुनरुक्ति करण्याचा पाठ आहे. नेस्त सं० नास्ति, नाबूद फा० बूदन्=होणें, मिळून नष्ट, नाइनाट ह्या अर्थी.

६०. अबदल्ली यास 'इराणी' असें सर्वत्र ह्या बखरींत म्हटलें आहे. गिलच्या अगर दुराणी असें पाहिजे होतें.

६१. फत्तेकरणें=जिंकणें.

६२. 'बादशहास न मानितां मोडीत चालिला' प्र० ४.

पाठविलीं तीं सर्व भाऊसाहेबांनीं श्रवण करून सावध जाहले आणि नि समजले कीं, जाटाचा विश्वास नाहीं. हा कार्यवादु, समयास फिरून आम्हांस हाच शत्रु. याचा भरंवसा नाहीं. तेव्हां दढोत्तर विचार करून धारणास्तव भाऊसाहेब यांनीं उत्तर सांगून पाठविलें कीं, "तुम्हांस जें तें आम्हांस ही मान्य." असें सदाशिवपंत भाऊ यांणीं व मल्हारजी होळ यांणीं सांगून पाठविलें. "यांत अणुमात्र तफावत नाहीं. या उपर तु कराल तेंच प्रमाण, ही खातर जमा असों देणें. बादशाही कायम कर आणि शत्रूचा पराभव करावा. मागें फिसाइतामुळें बुबुबेगैम यांणीं बादशाही नाश बहुत केला आणि सगळी बादशाही बुडविली. कांहीं स्वहित पाहि नाहीं. बेटी[७३] देऊन इराणी शेर[७४] केला. अटकपार होऊन हा पावेतों आला नवता. शहा [ जहान ] बादशहा यांणीं बावन्न बादशहा काबी केले. अलमैंगीर बादशहानीं प्रौढ प्रताप सामान्य केला नवता. इराणी दुराणी, मुलतान, मस्कत, पुर्तकाल[७५] ज्यांचे दहशतीनें थरथर कांपत होते, त्या बादशहांची अबरू गृहकलहा मुळें अगदींच गेली. बादशाहीची जागा इराणी दुराणी आणि गिलच्या यांस केवळ पायवाट जाहाली. दौलतींत मुरबी[७६] अमीर व दिवाण समजदार, शाहणा, नीतिवंत माणूस कोणी राहिला नाहीं. आम्ही फरजंद[७७], लहान माणूस न हों. जेणेंकरून बादशाही सलामत[७८] राहील तेंच करावयास आलों आहों. ही गोष्ट पसंतीस न आणितां आमचा तुम्हांस बे. विश्वास वाटून आला. हें तुमचे प्रत्ययास दिवसेंदिवस येईल. इराणी परम बादशाहीचा नाशकर्ता अब्दल्ली यांणीं भर देऊन अगदींच बादशाही बुडवावी या विचारावर प्रवृत्त जाहला. आणि मनसुरअल्ली व सुजातदौला [ व ] अवांतर कारभारी इराणी दुराणीकडे मिळाले. तुम्ही बादशाहीचे दुवागीर[७९], इमानी आहां. आमचा वसवसा[८०] काडीमात्र न धरितां[८१] एक दील होणें. इराणीचा हिशेब कोण धरितो ! आमचे खातरेंत नाहीं. तुम्हांजवळ आम्हांविषयीं हरएक

७२. दिल्लीच्या बादशाहाची बायको.

७३. ही बेटी अबदालीच्या मुलास (तैमूरशहा यास ) दिली.

७४. शेर=वाघ=वरचढ, जबरदस्त.

* अलमगीर=विश्वजित्, औरंगजेब.

७५. पूर्तकाल=पोर्तुगाल.

७६. मुरबी=अभिमानी, कार्यधुरंधर, जाणता.

७७. फरजंद=पुत्र, पुत्रवत् मानिलेले. शाहू महाराजांस औरंगजेबाची कन्या पुत्रवत् लेखी व म्हणूनच राज्याची चौथाई त्यांस दिली होती. या गोष्टीस अनुलक्षून भाऊंचें लिहिणें आहे.

७८. सलामत=सुरक्षित.

७९. दुवागीर=आशीर्वाद देणारे, बरें चिंतिणारे.

८०. वसवसा=धास्ती, संशय.

८१. या शब्दा पुढें "सर्वजमानतीनिशीं" प्र० ३.

वेशीं कफौरत पडते. त्या गोष्टीवर न जावें. जे बदनजर धरून वर्तणूक ोल त्यांस त्यांचा कुलस्वामी पाहून घेईल. तुम्ही मुरबी सर्व जाणत अ- अगदीं छौंन न केला. नजरेनें पाहून आम्हांस मग दोष ठेवावा. ांगलें नव्हे." याप्रमाणें बहुत प्रकारें युक्तिप्रयुक्तीनें बुद्धिवाद केला. परंतु अविश्वासू. त्यांणीं भाऊसाहेबांस विश्वास दाखवून मनसूरअल्लीकडे व तदौला याजकडे परस्परें सूत्र लावून इराणी सुद्धां भारी फौजेनिशीं एका- ा दिल्लीस आणिलें. ते कालीं महासंकट दुर्घट प्राप्त जाहालें. जाट चा भरंवसा पूर्ण सदाशिवपंत यांसि कळला.

या समयीं दोन शह रक्षूनें निघावें यांतच उत्तम आहे, याप्रमाणें मनसोबा न सदाशिवपंत परम सक्रोध होऊन बादशहाचें तख्त जडित नवरत्नाचें सुव- चें होतें तें फोडून, त्यांतील मुबलख द्रव्य काढून, फौजेस वांटून आपले बुद्धीनें फौजा संभाळून निघोन कौलिंदीतटाकास दाखल जाहाले. जाटांत व सदाशिवपंतांत पातशहौतीमुळें अंतर्यामीं परस्परें विकल्प वाटून आला. स्नेह- भाव रक्षिल्यामुळें व्यंगोक्ति दिसों दिली नाहीं. केवळ सदाशिवपंतांनीं व जाटांनीं एकमेकांस विरोध दिसों न दिला. परभारें जाट निघोन आपले देशाचे सरेदेस गेले. इराणीसही आपलें भेंय अणुमात्र जाटांनीं दिसों दिलें नाहीं. याप्रमाणें सुरजमल्ल जाटाचा मजकूर पूर्ण सदाशिवपंतांस कळोन आला. सदा- शिवपंत यांणीं आपली फौज व मल्हारजी होळकर व जनकोजी शिंदे वगैरे सारी फौज दक्षणची करौराची सव्वा दोन लक्ष उरली व उत्तर खंडांतील मराठी फौज व रजपूत व रांगडे व मेवाती आदिकरून एक लक्ष एकूण सव्वातीन लक्ष फौज, येणेंप्रमाणें जमाव एक ठिकाणीं करून शिवाय पायदळ साठ सत्तर हजार, तोफखाना वगैरे कारखाना सुद्धां यमुनातटकास इराणी येण्याचा रस्ता कोंडून, तोफखाना पसरूंन, फैळी धरून, चौफेर फौजा उतरविल्या. दाणा- वैरणीकरितां बादशाई खालचा मुलूख अगदीं वीस पंचवीस गांव पर्यंत चौफेर बेचिरौंख जाहाला. दाणा वैरण अगदीं बंद जाहाली. शेराची धारण झाली.

---

८२. 'बावे' हा शब्द प्र० १।२ मध्यें नाहीं.

८३. कफारत=भेद, तंटा.

८४. छान=(छानणें) फोड, चौकशी, शोध. प्र० १।४ मध्यें 'अगापिछा न केला' असें आहे तें मोडी नीट न लागल्यामुळें प्रत करणारांनीं चुकीनें लिहिलें.

८५. दोन शह रक्षून=जाटांचा व अबदालीचा असे दोन मारे चुकवून !

८६. कालिंदी=यमुना.

८७. 'पादशाही तख्तामुळें' प्र० १।४.

८८. व्यंगोक्ति=उघड वैर.

८९. सरद=सरहद्द=सीव.

९०. 'अविश्वास' प्र० ४.

९१. कराराची=निश्चयाची, इतबारी.

९२. पसरणें=(भोवतीं) मांडणें.

९३. फळी=दाट ओळ.

९४. बेचिराख=दीपहीन, ओसाड.

तेही मिळेनाशी जाहली. वीस पंचवीस हजार फौज चौफेरें दिवसाचे मजलीस जाऊन भरवस्ती गांव असतील ते लुटून आणावे तेव्हां अन्नपाणी मिळावें. याप्रमाणें जाहालें. खजीनाही चालेनासा जाहला. अगोदर श्रीमंतांनीं दोन कोट रुपये हिंदुस्थानाचे मोहिमेस भाऊसाहेबांकडे पाठविले व मल्हारजी होळकर याजकडील खजिन्यांतील ऐक कोट व जनकोजी शिंदे यांजकडील खजीना दोन कोट व शिवाय सरकारी दोन कोट मोंगाहून आले एकून सात कोट रुपये लष्करांत पावले. आणखी ऐवज शहर पुण्याहून रवाना जाहाला, तो लष्करांत पावलाच नाहीं. वीस पंचवीस हजार फौजेला मार्ग फुटेनासा जाहीला. खजीना पाठविला तो सुरंजेसें व उज्जनीस व नरवरास व भेलशास अवांतर जागजागीं अटकून राहिला. लष्करचे कागद पत्र अगदी बंद जाहाले. तेव्हां कुंभेरीकर जाट सुरजमल्ल यांनीं बंदोबस्त आपले तर्फेनें करून एक कोट रुपये लष्करांत पावते केले. बुंदेले यांणीं व बागलकोटकर यांणीं, व बंगाले खण्डेकर यांनीं, सवाईराम जयसिंग यांणीं, व चितोडकर यांनीं गुप्तरूपें खजीना पाठविलीं, तो कुंजपुरांवरच होता. त्याची बातमी बारग्यांचे फौजांस लागतांच एकाएकीं जाऊन, धोशा घालून खजीना लुटून नेला. तेथें मातबर अमीराचे व पठाणाचे व रोहिल्याचे कबिलें होते ते अगदींच सांपडले. ते लुटून फस्त केले. आणि अटक करून ठेविले. सावकारी द्रव्य मातबरांचें व अमिराचें वगैरे मुबलख बादशाही खजीना शहाजाफरांचे वेळचा होता तो जोरावारीनें लुटून फस्त केला. ऐकून नऊ कोट रुपये सरकार जामदारखान्यास दाखल जाहाले. कुंजपुरा लुटून दरोबस्त फस्त केला. द्रव्याची लष्करांत महामुरी जाहाली. तेव्हां तीन शेर धान्य मिळों लागलें. खाण्यापिण्याची वगैरे सरंजामाची उठवण मोडली. या विराहित दिल्ली संस्थानचा मुलूख दरोबस्त मारून लुटून फस्त केला.

---

९५. 'फौज चार दिवसाचे' प्र० ३ व ४.

९६. 'तीन' प्र० ३ व ४.

९७. आणखी दोन कोट सरकारी खजीना आला या बदल प्र० ३ व ४ मध्यें उल्लेख येथें नाहीं.

९८. ही खजीना घेऊन येणारी फौज असावी.

९९. 'सुरतेस' असें कांहीं प्रतींत आहे तें चुकीचें होय.

१००. हें मागील वृत्ताशीं चांगलेंसें जमत नाहीं. कोठे पाठविले ? अबदालीकडे ?

१. 'बागलकोटकर' कोण ?

२. 'बंगालखडीकर' प्र० २.

३. या शब्दा पुढें "तो कुतफां जावा म्हणून पाठविला" प्र० ३ व ४.

४. यावरून या जाट वगैरे मंडळीनें खजीना मुसलमानाकडे पाठविला असें कदाचित् होईल.

५. धोशा=झपाट्याचा हल्ला.

६. कबिले=कुटुंबें.

७. 'शहाजाद्याचे' प्र० २. 'शहाजद्याचे' प्र० ३. शहादानचे' प्र० ४.

८. महामुरी=पुरवठा.

९. उठवण=तोटा, आपत्ति.

ही हकीकत सुजात दौला यांणीं इराणीस तपसीलवार लिहून पाठविली. इराणी दुराणी दरकूच यमुनातीरास आले. पश्चिमेकडून घाट नदीचा उतरून, दोन तीनशें नावांचा पूल बांधोन नदी उतरूं लागले. तेव्हां दमाजी[10] गायकवाड व समशेर बहादर व विठ्ठल शिवदेव व अंताजी माणकेश्वर व यशवंतराव पवार व जनकोजी शिंदे वगैरे सरदार व पथके व इब्रामखान गाडदी यांजकडील सरदार पंचवीस हजार लोकांनिशीं बराबर सात आठशें † तोफा मोठ्या पल्ल्यांच्या[11] व जेजाला व जंबुरे व गरनाला पुढें देऊन सरबत्ती केली. त्या सरबत्तीचे धडाक्यानें शत्रूकडील फौज जितकी यमुना उतरत होती तितकी ठार जाहाली; कोणी जिवंत राहिला नाहीं. मागील दुमाल्यावर[12] जी फौज होती त्या फौजेनें भाऊसाहेबांकडील मारागिरीची दहशत खाऊन पळोन गेली.

तदनंतर इराणीकडे सदाशिवपंतांनीं वकिलाबरोबर सांगून पाठविलें कीं, तुह्मीच चढाई करून आलां तसेंच यमुना उतरून आलीकडे यावें अथवा आह्मीच तिकडे येतों. एकवेळ तुह्मांशीं व आह्मांशीं लढाई व्हावी हाच संकल्प आमचे अंतःकरणापासून आहे. यांत तफावत नाहीं. असा सिद्धांत करून वकील पाठविले. त्या वकिलांनीं पत्राप्रमाणें वगैरे मुखजबानीचे जाबसाल निवेदन केले. अबदल्ली व सुजातदौला व मनसूरअल्ली या त्रिवर्गांनीं तीं पत्रें वाचून पाहून ह्मणूं लागले कीं, "मराठे बडे कट्टे लढनेवाले उनके आं गु खुदा खडा रहनेका नहीं अनानेका[13] दुकाल पडा तोबी लढनेकू हटेले खडे रहते है. इस लढाई खातर सबने बडी धूम मचा* दीई. सल्ला करनेकू कुछ लोक भेनते नही. मराठे लोगोंका बडा जोर नजर आताहै. लढाईके खातर सो दोन सो कोस दुनयाबी बेचिराख हो रही. क्या करना !" अशीं उत्तरें दिलगिरीचीं त्रिवर्गांचीं पठाण रोहिले यांणीं श्रवण करून उत्तर दिलें कीं, "या उपर बारग्यांची[14] फौज चढून लढाईच्या उद्देशें आली असतां बेलाशक मोहरम[15] करूं. यांत अंतर नाहीं. गलीम बहुत बदमस्त जोरावर जाहाला. त्यास आह्मी यमुना उतरून पैल तीरास येतों. याप्रमाणें पत्राचीं प्रतिउत्तरें लिहून सदाशिवपंत भाऊंस वस्त्रें व घोडा व शिरपेंच व

---

१०. 'पिराजी' प्र० ३.

† 'सात आठ' प्र० ३.

११. मोठ्या पल्ल्याच्या=ज्यांचा मारा लांब होईल अशा.

१२. दुमाल्यावर होती=पाठीमागून मदतीस येत होती.

१३. किंवा 'अजानका' जा ज आणि ना न हीं अक्षरें मोडींत बहुतकरून सारखीं असल्यानें स्पष्ट कायतें कळत नाहीं.

* मचा दीई=वाढविली, माजविली ( मचाना ).

१४. बारगे=लुटारू, बेबंद लोक.

१५. मोहरम=( मोहरमच्या कत्तलेसारखी ) कत्तल.

मोत्यांचा तुरा व जडावाची कंठी व शुभ्रवर्ण ऐरावतीतुल्य हत्ती, मुलतानी तरकस[16] कमाना दोन, येणेंप्रमाणें वकिलाबरोबर देऊन सदाशिवपंत भाऊंच्या लष्करांत आले.

वकील रवाना केल्यानंतर अबदल्ली व सुजातदौले व मनसूर अली या त्रिवर्गांनीं फौजेसहवर्तमान जीविताचा संकल्प[17] करून, दोन लक्ष सेनासहित तोफखाना मागें टाकून पांच सातशें नावांचा पूल बांधोन लष्कर तमाम उतरूं लागलें. ते समयीं तेथें बहुत मारामार जाहली. बारग्यांकडील[18] तोफखाना सुरू जाहल्यामुळें इराणीकडील लोक फारच जायां जाहले. परंतु तितुका अग्नीचा पर्जन्य पिऊन, लढाईचा गुमान[19] न धरितां, इराणीकडील फौज दरोबस्त यमुना उतरून दक्षणतीरास आली. मागें कौरव पांडवांचें युद्ध जाहले तें पुराणोक्त थोर वक्ते सांगतात आणि श्रोते ऐकतात. तें वर्तमान प्रत्यक्ष पहाणें प्राप्त जाहलें. कुरुक्षेत्रीं पश्चिमेकडे इराणीकडील सरदार फौजेनिशीं व पूर्वेकडील बाजूस सदाशिवपंत बहादर सेनासहवर्तमान उभे राहिले. अघाडी पिछाडीस गोठास गोठ भिडले. इराणी दगेखोर म्हणून सदाशिवपंत सावध रीतीनें राहिले. कामाठी व बेलदार आणून लष्कराभोंवती खंदक रुंद पंधरा हात व उंच दहा हात याप्रमाणें तयार केला. सर्व तोफखाना लष्कराभोंवता पसरून रात्रंदिवस सावध राहिले. कोणी युद्धास प्रवर्तेना. दोन महिने पर्यंत मुक्काम पडला. लष्करांतून तफावतीनें मुक्काम करावा तो न करितां इराणी हांवभरी[20] होऊन पिच्छा पुरवूं[21] लागला. याजकरितां पेशवे बहादूर हटातटानें इराणीच्या लष्करा जवळच राहूं लागले. मुलूख अगदीं वीस पंचवीस गांवपर्यंत बेगर्द[22] बेचिराख जाहला. दाणावैरण मिळेनासी जाहली. सदाशिवपंतावर मोठा तवई[23] वक्त गुजरला.

[ तेव्हां ] प्रथम सदाशिवपंतांनीं आपली फौज व सरदार तयार करून गोठ

---

१६. तर्कशकमान-तर्कश=तूणीर, बाणांचा भाता. कमान=शिंग लववून केलेलें धनुष्य, कमठा. 'शार्ङ्गःकमानमित्युक्तं' तूणीरस्तर्कशः° ' राजव्यवहारकोश.

१७. जीविताचा संकल्प करून=जीवावर उदार होऊन.

१८. 'बारगे' 'गनीम' असें परदेशीय लोकांनीं आह्मास ह्मटलें त्यांत विशेष नाहीं. पण आमच्याच लोकांनीं आपणास असें म्हणून घ्यावें ही आश्चर्याची गोष्ट आहे. भाऊसाहेबांच्या बखरींत मराठ्यांस 'गनीम' अशी संज्ञा सर्वत्र दिली आहे. 'आपले लोक,' किंवा 'मराठे' असें ह्मटलें नाहीं. या बखरींत 'बारगे' या शब्दानें मराठ्यांचा व्यवहार केला आहे. इंग्रजी 'नेटिव' शब्दाची याचप्रमाणें स्थिति थोडथोडी होत चालली आहे.

१९. गुमान=बख्खा, हिशेब.

२०. हांवभरी=विशेष उत्सुक, उल्लु.

२१. पिच्छापुरविणें=पाठीमागें लागणें, घिरट्या घालणें.

२२. बेगर्द=वृक्षरहित. बेचिराख=दीपहीन, ओसाड.

२३. तवई=( प्राप्त झालेलें, खरोखर ) संकट.

सोडून बाहेर निघाले. तीन टोळ्या केल्या. एक पूर्वेकडे गोठ पाठीशीं घालून मल्हारराव होळकर पन्नास हजार फौजेनिशींपुढें तोफखाना देऊन उभे राहिले. उत्तरेकडे खांसा विश्वासराव व समशेर बहादर व जनकोजी शिंदे साठ हजार फौजेनिशीं उभे राहिले. व पश्चिमकडे खुद्द सदाशिवपंत व यशवंतराव पवार व आपाजी जाधवराव वगैरे साठ हजार फौजेनिशीं उभे राहिले. व इराणी दुराणी यांणीं आपला गोठ सोडून तयार होऊन आले. त्यांणींही आपले फौजेच्या तीन टोळ्या केल्या. अबदल्ली व सुजातदौले व हस्तनापूरवासी, मनसूरअल्ली वगैरे उभे राहिले. प्रातःकाळच्या पांच तास दिवसापासून सूर्य-अस्त पावेतों युद्ध जाहलें. सदाशिवपंतांकडील तोफखान्याच्या अग्नीचा मार जबरदस्त जाहला. तितकी आग पिऊन[२४] गिलचे चालून आले. ते समयीं सदाशिवपंतांनीं मागें पुढें अणुमात्र न पाहतां इराणीच्या फौजेवर चालून घेतलें. तेथें हातघाई मोठी जाहली. नामी नामी सरदार सदाशिवपंतांकडील ठार जाहले. धारकरी शिपाई हजार बाराशें रणांत पडले. जखमी हजार बाराशें जाहले. व हजार बाराशें घोडे तळावर राहिले. हस्ती नग पंचवीस ठार पडले. अबदल्लीकडील पठाण चार हजार ठार जाहले. या बिरहित उंट नफरे[२५] पांचशें व बाणाच्या कैच्यांचे व दारू गोळ्याचे व बातमीचे सांडणीस्वार मिळोन बहुत जायां जाहले. जखमी माणुस बहुत जाहले. सुजातदौले याजवर लढाईचा मोठा कहर बर्षला. मनसूरअल्लीकडे लढाईचा प्रसंग थोडा बहुत पडला. हातघाईमुळें मनसूरअल्लीकडील लोक साडेसातशें कामास आले. शिवाय सहस्रावधी[२६] जखमी जाहले. हस्ती नग पंधरा व उंट नफर दीडशें येणेंप्रमाणें ठार पडले. अबदल्ली शिकस्त खाऊन फौजेसुद्धां मागें सरून आपले गोठांत गेले. सुजातदौले व मनसूरअल्ली आपआपले गोठांत गेले. मराठे यांणीं लढाईची शर्थ केली. आजपर्यंत तिमिरलंगें[२७]पासून बहुत दिल्लीच्या सिंहासनावर बादशहा जाहले. पुंड पाळेकरीं[२८] व रजपूत रांगडे व मेवाती, मारवाडी इत्यादिक जाहले, परंतु अशी लढाईची मर्दुमी कोणीही केली नसेल. मराठी फौज आह्मांस मोजेंतां दिसत नाहीं, याजकरितां मोठ्या तरतुदीनें आपल्या लष्कराभोंवते छबीने* रात्रंदिवस मोठ्या मोठ्या सरदारांचे नेमून देऊन हुशारीनें राहिले.

या उपर इराणी व सदाशिवपंतांनीं दम खाऊन आपल्या गोठासमीप चवक्या

---

२४. पिऊन=सोसून.

२५. नफर=नग, डाग, सर, संख्या.

२६. 'सहस्रावधि' या शब्दाबद्दल प्र० ३ व ४ मध्यें "रजपूत रांगडे व पठाण व कायस्थ व मारवाडी" असें आहे.

२७. 'तिमिरलंग' ज्यास तैमूरलंग ह्मणतात.

२८. 'पुंडपाळेगार' प्र० ३.

२९. 'मेचता' प्र० ३ व ४.

* छबीना=पहारा.

पहारे कडोविकँडीचे[३०] ठेवून तयारींतच उभयतां होते. अशा अवकाशांत दुराणी यांणीं आपल्या तर्फेनीं आणखी एक वेळ वकील पाठवावा असा सिद्धांत करून सुजातदौले व मनसूरअल्ली या उभयतांचें संमत घेऊन रहिमतखां व रसूल पठाण व मणिराम रजपूत व महादाजी[३१] सुभानराव ऐसे चौघेजण पाठविले. कारण कीं, "तुम्हीं जोरावार होऊन अटकेची सरहद्द व मारवाड व लाहूर प्रांत व बंगालें[३२] व अंतरवेद व काशी, प्रयाग व गया व काश्मीर पावेतों मुलूख काबीज करावयाची उमेद धरून बादशाई खजीना बंद केला. अटके पलीकडे ठाणीं घालावीं, चितोड व द्वारका व गुजराथ आदिकरून खालसा मुलुख केला. आग्रा प्रांतांतील खंडणी घेऊन अंमल करितां. या खेरीज दिल्ली म्हणजे बादशाई तख्ताची जागा, तेथील अमर्यादा करून फौज दरवर्षीं पाठवून कैदकानू तुह्मीं आपली बसविली. याप्रमाणे काशीपलीकडे[३३] दमाऊ कमाऊचे पहाडापर्यंत अंमल सुरू करूं पहातां. बद्रिकाश्रम पावेतों जावयाची उमेद धरितां. रूमशाम येथें एकछत्री राज्य करावें, चतुःसमुद्र पावेतों पृथ्वी पादाक्रांत करावी, ही इच्छा रूमशामचे बडे बादशहा यांणीं नऊशें नऊ संदितें[३४] पेगंबर सुलतान महंमद यांणीं फर्जंदांस[३५] हुकूम केला कीं, दिल्लीपत बादशहानीं आम्हांस कुमकेस बोलाविलें. तुह्मीं अटकपार होऊन दक्षणेंत जाऊन दिल्लीपत बादशाहीचा मुलूख काबीज करून बंदोबस्तानें दिल्लीपतीची हुरमतें[३६] राखावी. या कारणास्तव आह्मी फौज घेऊन दिल्लीपतीच्या कुमकेस आलों. दिल्लीश्वर म्हणजे केवळ ईश्वरी अंश, संस्थान सर्व हिंदू मुसलमानांस वंद्य. असें असतां बादशाहींत फितूर नाहला. रजपूत रांगडे व अवंतर थोरथोर संस्थानकरिते जबरदस्त आहेत, ते तुह्मीं कसोसीतें[३७] आणून दिल्लीपत बादशाहीचा व सुरळीतपणाचा जैंवा[३८] बसवून देऊन, तुह्मीं आपले स्वारीचा खर्च दिल्लीपतीपासून घेऊन आपले स्वदेशास जावें. व चितोडकर राणे संग्रामसिंग व उदेपूरकर व अमेरीकेर[३९] व सवाई जयसिंग जैपूरकर[४०] या शिवाय बावन्न उमराव यांणीं बादशाहीच्या जहागिरी बंद

---

३०. कडोविकडीचे=नानाप्रकारचे, तजविजीचे.

३१. हा 'महादाजी सुभानराव' इकडे कसा !

३२. 'बागलाण' प्र० १ व २.

३३. या शब्दापुढें प्र० ३ व ४ मध्यें "तीन हजार कोसपर्यंत" असें आहे.

३४. संदित, सदित, सद्दींत !

३५. रूमशामचे बडे बादशहा कोण ! नऊशे नऊं काय ? पेगंबर सुलतान महंमद कोण ? फर्जंद=चिरंजीव किंवा पुत्रसम मानिलेला. किंवा गुलाम.

३६. हुर्मत=मान.

३७. कसोशी=जरब, धास्ती.

३८. जबा बसविणें=समेट करणें.

३९. येथेंही पूर्वीप्रमाणेंच 'अजमीरकर, अमीरकर' वगैरे पाठ आहेत.

४०. या शब्दापुढें "हिंदुपतकर" प्र० १ व "टेहेरीकर" प्र० ३.

केल्या आणि तुह्मांशीं मिळून संपूर्ण हिंदूमय करूं पहातात. बादशाही सिंहासन अनादि होतें, तें ज्यांनीं बुडविलें त्यांचीं पारिपत्यें करावीं, व तुम्हांसही बेकैदी चालल्यास इजा द्यावी, सबब आमच्या खावंदांनीं आह्मांस रूमशामाहून बिदा[41] करून पाठविलें. तुमचा पिच्छा पुरवावा लागेल. कारण कीं, तुह्मी अमर्यादा करून दक्षणेंतील बादशाहीचे खावंद निजाम उल्मुलूख व तुकुशा[42] व विजापूर येथील इदलशा, तैसीच बेदरे[43] व दौलताबादसारिख्या जागा, अमदानगर व कर्नाटक काबीज करून हैदराबादेस मोर्चे लाविले. सहासुभे दक्षणचे किलिजखां मुतालक व फत्तेजंग बहादूर व तोलेजंग बहादूर व शिध्धी अमीर वगैरे बादशहाजादे दिवसेंदिवस खालीं आणले व बऱ्हाणपूरकर व औरंगाबाद व सोंदे बिदूर[44] व त्रिचनापल्ली व श्रीरंगपट्टण व मछली बंदर व समुद्रतीर व गोमांतक व तमाम कोंकण व खंबायत अवंतर समुद्रांतील किल्ले महाकुबैल[45] जागा एकापरीस एक बांक्या[46] सुरंज, भेलसे, गढेमंडळें[47], खानदेश, नेमाड, व मनमाड व वऱ्हाड व खेचीवाडा व हडोती मुलूख काव्या-दाव्यांनें[48] सर करून, हांवभरी भरून दिल्लीस हिंदुपत बादशहा बसवून बेवीस उमराव पिढीजादे नांव बिनांव केलेले तुमच्या दहशतीनें कितीक मांडलिक जे आपल्या जागा सोडून फकीर होऊन देशांतरास गेले. सर्व बादशाही तुह्मी मराठियानीं बेकैदी करून बुडविली. अलमगीर बादशहाचे वेळेचे नामी नामी उमराव शास्तेखां व असतखां व झुलपुकरखां नबाब नसरतजंग[49] व हिंमतखां व फत्तेसिंग व मनसूर अल्लीखां पठाण व खानखां व इब्रामखां व हफ्तहजारी[50] व जामत अल्लीखां व फर्दुल्लाखां व फत्तेखां व हसनखां व रणमस्तखां व महमदखां व खावंदखां व कासमखां व किलिजखान, जैसिंग व संग्रामखां जोरावरसिंग व महिपतसिंग[51] असे थोरथोर यांचे बेटे व भाई व जांवई यांस गर्दीस मेळवूनें[52] नेस्तनाबूद केलें. तसा हा मजकूर नव्हे. एवढी बादशाही, अनादि तक्त, याच तक्तावर युधिष्टिर बसत होते, तें तक्त तुम्हीं फोडून बादशहा परांगंदा करवून आणखी अटकपार होऊन

---

४१. बिदाकरणें=धाडणें, रवाना करणें.

४२. तुकुम शहा कोण ? 'कुतब' तर नव्हे ?

४३. 'हैदर' प्र० १ व २. हें चुकीचें आहे.

४४. 'बिदनूर' तर नव्हे ?

४५. कुबल=मजबूद.

४६. बांक्या=बेलाग, दुःसाध्य.

४७. 'गढेमंडळिक' प्र० १ व २.

४८. कावादावा=कपट, युक्तिप्रयुक्ति.

४९. 'नसरजंग' प्र० १ व २.

५०. 'हपतीत' प्र० १ 'हैपतीन' प्र० २ 'इतप्ते' प्र० ३ प्रत करणारास मूळचा शब्द कळला नसला म्हणजे त्याचें कसें वेडेंवाकडें रूपांतर करितात त्याचें हें एक चागलें उदाहरण आहे. हफ्तहजारी=सप्त सहस्री, सात हजार स्वारांचा सरदार.

५१. 'हिंमतसिंग' प्र० ३ व ४.

५२. 'मारून' प्र० ३ व ४.

रूमशामची बादशायत घ्यावयाची मसलत करून, तेथीलही सरदेशमुखीची कैद कानू बसवून हक्क घेऊं पहातां. यांत कोणती किफायॅत आपण पाहिलीत ? पेशजी बादशहा कृपावंत होऊन साडेसहा सुभे दक्षणेंतील सरदेशमुखी तुह्मांस करार करून दिल्ही, तो वंत⁵⁴ अनुभवून सुखरूप रहाणें. जाजती उपद्रव मुलुखास व बादशहास द्यावयाची गरज नाहीं. नर्मदा दक्षणतीरापासून पलीकडील हद्द तुह्मीं आपली संरक्षण करून असावें. आणखी तुमचे फौजेस घासदाण्याबद्दल दोन कोटि रुपये व एक कोटि रुपये स्वारीखर्च येणेंप्रमाणें रोख देऊन बादशाही सनद नवीन करून देतों. त्याबरहुकूम घेऊन बादशाहाची नौकरी करीत जाणें. हा करार असल्यास सलुख संपादिला जाईल. ही गोष्ट तुमचे खातरीस न येई तरि लढाई करावी लागेल. याचा पक्केपणें विचार करून सांगितल्या गोष्टी मान्य असल्यास लिहून पाठवाव्या. त्यासारिखे आम्ही बादशहाची खातरजमा करून येतों. सेवकपणाचे धर्मानें बादशहाचे पायांजवळ वर्तणूक करून, बादशहाचे खिजमतीस एक साल राहून, सरफॅराई करून घेणें. जिदें वाढविल्यास कामास येणार नाहीं. त्यांत तुम्ही माकूॅल आहां.

याप्रमाणें सर्व मजकूर इराणीच्या वकिलांनीं सदाशिवपंतांस समजाविला. तो मजकूर सदाशिवपंतांनीं श्रवण करून मातबर सरदार व मल्हारजी होळकर यांचे विचारें ठरवून सांगितलें कीं, “ हिंदूपत बार्दशाही येथील बंदोबस्त करणें तो आह्मीच करूं. तुम्ही पर पातशहाचे असतां आपली हद्द सरॅदे टाकून मनसूर अल्ली व सुजातदौले यांचे विचारें हांवॅभॅरी होऊन आलीकडे आलां. मागें तुह्मींच येऊन अगदीं बादशाही बुडविली. हल्लीं मिरॉं बुबु बेगम यांचे अनुमतें येऊन व्यर्थ दंगा आरंभिला. ही गोष्ट इनसॅान नव्हे. मागें आॅलीं ते समयीं आम्ही असतों तर बादशाहीची खराबी होऊं न देतों. आतां तुम्ही आमचे मसलतीस अडथळा करणार कोण ! आमचे चित्तास येईल त्याप्रपाणेंच करावयास श्रीमंत नानासाहेब समर्थ आहेत. रूमशामची खबर आम्ही घेणार, तेथें तुमचा मजकूर कोठें ! तुम्हीं आपल्या मार्गें अटक उतरून जावें. भाई-

---

५३. किफायत=विशेष फायदा.

५४. वंत=वांटा, हिस्सा.

५५. सरफराई=सरफराजी !=शिफारस, गौरव.

५६. जिद=जिद्द=उपरोध, विरुद्धता.

५७. माकूल=मान देण्यास योग्य, उचित. ‘ माकूलमुचितंभवेत् ’ राजव्यवहार कोश.

५८. ‘ बादशाहा ’ प्र० १ व २.

५९. सरद—सरहद्द=सीमा.

६०. हांवभरी=उत्कट इच्छा धरिली ज्याणें असा.

६१. ‘ मिमीरा ’ पाठभेद.

६२. इनसान=न्यायाची ? योग्य !

६३. नादिरशहाच्या स्वारीस उद्देशून हें म्हणणें आहे.

चारा राखावयाचा असल्यास लौकर फौजेसुद्धां माघारें जावें. जे जे तुम्हांस आमचे पारिपत्यास्तव घेऊन आले असतील त्यांनीं तरी कोणती किफायत पाहिली ! आम्ही तुम्हांस एकंदर[64] दबून राहणार नाहीं. आम्ही सर्व गोष्टींनीं तर्तूद[65]दार आहोंत. हिंदुपत बादशाहीचे वगैरे माणूस मातबर उमदे दौलतकर्ते पंतप्रधान बहादूर आहेत. त्यांजवर सर्व राज्याचा भार आहे. चार लक्ष फौजेचे बादशहा श्रीमंत छत्रपती महाराज सातारकर, त्यांचा जय प्रताप विक्रम पराक्रम वरद हस्त आमचे मस्तकीं आहे. सर्व धरित्रीचें राज्य स्वामिकृपेनें संपादितों. आजपर्यंत संपादीतच आलों. तुमचे हुकुमाची तमा[66] धरीत नाहीं. लढाई करावी हाच आमचा निश्चय आहे." असें साफ सांगितलें. व सदाशिवपंतांनीं आपले तर्फेने लक्ष्मण बल्लाळ व बुरूणशा या उभयतांस इराणीकडे वकिलीस पाठविलें. त्यांस तेथें बोलण्याची आज्ञा झाली जे, तुम्हीं फौजेसुद्धां माघारें जावें. उद्यां येथें रहावयास दरकार[67] नाहीं. आज्ञेप्रमाणें वकिलांनीं मजकूर निवेदन करितांच अबदल्लीस परम विषाद आला. आणि तेच क्षणीं भाऊसाहेबांकडील वकिलांस[68] अवकाश न घेतां माघारें रवाना केलें. आणि सांगोन पाठविलें कीं, उदईक लढाईस तयार होणें. आम्ही चालून येतों.

याप्रमाणें वकिलांचीं कठोरपणाचीं भाषणें सदाशिवपंतांनीं समजून घेऊन, मजालस[69] करून, तमाम लहान थोर सरदार बोलावून आणून सरफराई[70] केली. मोत्यांच्या कंठ्या व शिरपेंच व जडावाचीं कडीं व कलग्या व तुरे, चौकडे व मंदिल व शालजोड्या व बादली[71] चिरें व घोडे व हत्ती व पालख्या व वस्त्रें व अबदागीर व फत्ते जाहल्यावर मानपानाच्या ताजिमी[72] व कोणास गांव व परगरणा व कोणास सचंतर[73] एक देशीचें राज्य, अवांतर सरदार लोकांचीं मनोधरणेचीं बोलणीं बोलून, सदहूप्रमाणें बक्षिसें देऊन, एक दील होऊन, सर्वांस स्तुतीनें गौरवून [74]नांवाजिलें. तेव्हां थोर थोर सरदारांनीं उत्तर केलें कीं, "भाऊसाहेब महाराज ! आम्ही तरि जीवित्वाची तमा धरीत नाहीं. इराणीची कथा किती ?

---

६४. एकंदर=बिल्कुल्, अगदीं.

६५. 'उपायस्तर्तुदः स्मृतः' रा० व्य० को०.

६६. तमा=भीति, धास्ती.

६७. दरकार=जरूर, गरज, अधिकार.

६८. हा शब्द प्र० १ व २ मध्यें नाहीं.

६९. 'मजालसी सभा ज्ञेया' रा० व्य० को०.

७०. मागें पृ० २१ टीप ५५ पहा.

७१. बादली चिरें=जरतारी वस्त्रें.

७२. 'अभ्युत्थानं तु ताजिमम्' रा० व्य० को०.

७३. 'स्वतंत्र' पा० भे०.

७४. भाऊंचें हें सर्व वर्तन ध्यानांत ठेविण्याजोगें आहे. भाऊंच्या स्वभावावर जे कांहीं आरोप आणिलेले आहेत त्यांचें अंशतःनिराकरण करण्यास हा लेख उपयोगी पडेल.

मारून गर्दीस मिळवून देऊं." हाच निश्चय सर्वांचा होऊन आपआपल्या शिबिरास गेले.

पहांटेची दोन तास रात्र उरली तेव्हां सरकारी साहेबनौबतें[75] लढाई-प्रसंगाची करून नकीबांस[76] ताकीद करावयास सांगितली. नकीबांनीं सर्व लष्करांत फिरून ताकीद केली. प्रातःकाल होतांच तमाम फौजेसुद्धां सरदार शिलेपोस[77] तयार होऊन आले. एकापरीस एक, भीमार्जुनासारिखे महावीर, दर रिकीबीस[78] तरवार गाजविणारे, अंगीं वीरश्रीचीं वारीं, रणांगणाचा शृंगार करून, घुंग्या[80] व बख्तरें[81] व टोपे[82], चिलखतें, बिन्नीया[83] व बिरजें[84] व वस्त्रें तकटी[85] व मुक्तमाला व मस्तकीं तुरे व कलग्या व अंगींचे बारा अलंकार व जरीचे अबदागिरें करून शोभायमान, हातीं पट्टे व गुरगुंज* व फिरंगीणा[86] व बिचवे व कटारा व पेशकब्जे व वाघनखें व भाले व कोयते व परीघ व पट्टीश व फरश व गारभांडीं[87] व सांगा व बरच्या व बंदुका कटीतटीस शस्त्रसंभार बांधून आपआपलाले वाहनारूढ होऊन, अंगीं स्फुरणें अतिशय, युद्धास जावयास अति उदित, स्वामिसेवेशीं तत्पर, अशा आवेशाचे पुरुष हजारों हजार सिद्ध झाले. अनसूर्ट[88], नव्या उमेदीचे, शिपाईगीरीची शर्थ व्हावी म्हणून उमेदवारीनें बिरदें बांधून, शिरीं समले[89] सोडून, घोड्यास जडावाचे अलंकार करून, एकाहून एक आगळे, जीविलास तृणप्राय मानणारे असे शहाण्णव कुळींचे मराठे घोड्यास नटनागर[90], जरीबादली पाखरा व शिऱ्या व सडकीं व पायीं तोडेरें[91] बांधून घोड्यांस थापटून उभे राहिले.

---

७५. साहेबनौबत=मोठा युद्धदुंदुभी.

७६. नकीब=चोपदार, मालदार.

७७. शिलेपोस=कवच वगैरे लढाईचा बंदोबस्त करून तयार.

७८. दररिकीबीस=पुनः पुनः,क्षणोक्षणीं.

७९. 'लावणारे' प्र० १, २ व ३.

८०. घुगी=अंगत्राण. हें बुर्णुसाचें असून शिरासुद्धां सर्व अंगाचें संरक्षण करतें. परंतु राजव्य० कोशांत 'घुगीनाम शिरस्त्राणं' असें म्हटलें आहे. पहिला अर्थ मोल्स्वर्थसाहेब देतात.

८१. बक्तर=जाळीदार पोलादी चिलखत. परंतु रा० व्य० को० "बक्तरं चर्म कीर्तितम्" असें आहे. पहिला अर्थ मोल्स्वर्थसाहेबांचा.

८२. टोप=शिरस्त्राण "टोपः शीर्षण्य नामकः" रा० व्य० को०.

८३. बिनी=नासात्राण.

८४. बिरजे–! बिरुदें तर नव्हेत ? सर्व प्रतींचा पाठ एक सारखाच आहे.

८५. तकटी=जरीचीं !

* गुर्गुज, गुर्गुजा=गदा.

८६. फिरंगाणा, फिरंग=फिरंगी तलवार. ही टोलिडो येथील असावी.

८७. 'व गारभांडीं' हे शब्द प्र० १ व २ मध्यें नाहींत. गारभांडें=गारेचा चाप आहे ज्या नळीस असें नलिकायंत्र, बंदुख वगैरे.

८८. अनसूट=अनुच्छिष्ट=ताजे, नवे.

८९. समले=पागोट्याचीं लांब टोकें.

९०. नटनागर ? जरी बादली पाखर=सुवर्णतंतुमय वस्त्राचें अश्वकवच. शिऱ्या ! 'शिरपा' असेंही होईल. सडका=अश्वचामर.

९१. 'तोरड' 'तोरड्या' पाठभेद.

तसेच हवदे व अंबाऱ्या व नवरत्नांच्या मुक्ताभरणी झालरा याप्रममाणें गजभार सिद्ध जाहले. जंबुरे व ऱ्हेकले व जेजाला व सुतारनाले व थोरलीं[९२] भांडीं येकूण आवाज दीड हजार, याप्रमाणें आराबीं[९३] पसरून व बाणांच्यीं[९४] कैच्या उंटांवर लादून, बाण लावणारे सहवर्तमान एकदांच सकल समुदायानिशीं सिंहनादें गर्जना करून रणास जावयास निघाले.

नंतर सैन्याचे चार भाग करून दक्षिणेचे बाजूस खांसे विश्वासराव साहेब वीसें[९५] हजार एकांड्यांनिशीं, त्यांचे डावे बाजूस मल्हारराव होळकर पन्नास हजार फौजेनिशीं, व पूर्वेस भाऊसाहेब साठ हजार फौजेनिशीं, व पश्चिम दिशेस जनकोजी शिंदे पन्नास हजार फौजेनिशीं, व उत्तरचे बाजूस तोफखाना सैंठ[९६] हजार पायदळासहित इब्राईमखान गारदी याजकडील लोकांनीं मस्तकावर ढाला घेऊन, नग्न हत्यारें करून, सावधतेनें, जुम्मेसैं[९८] न खातां, मांडीस मांडी देऊन, ऐंक[९७] घोडा राऊत न मिसैंळे[*] अशा बेतीनें[९९] निशाणांचे फरारे सोडून उभे राहिले.

इराणी दुराणी व हस्तनापुरवासी व दिल्लीपत बादशहा यांनीं फौजेच्या चार टोळ्या केल्या. एक्या टोळीस खांसे अबदल्ली पन्नास हजार फौजेनिशीं व दुसरे टोळींत सुजातदवले पन्नास हजार फौजेनिशीं व तिसरे ठोळींत मनसूर[१००]अल्ली तीस हजार फौजेनिशीं, मध्यभागीं मुख्य इराणी पाऊणलक्षं[१] फौजेनिशीं, याप्रमाणें आपआपले सरदारांस व पायदळांचे जमातदारांस निक्षूण ताकिदा रणप्रसंगाच्या होऊन बेलाशक चालून घेतलें. तोफखान्यावर जाऊन पडले. एक रंजकेची सरबत्ती होतांच दोहोंदळांत धुंधःकार होऊन एकमेकांस दिसेनासें जहालें. धुरानें दिवाकर अगदींच आच्छादित जहाला. आपपर कोणीं ओळखेनासें जहालें. दोन प्रहरपर्यंत एकसारिखा तोफखाना उभयतांकडील सुरू होता. धूर निवारण होतांच पाहूं लागले तों अमित्राकडील[२] पठाण वीस हजार कामांस[३] आले. व सदाशिवपंत भाऊंकडील लोक पायदळ व घोडेस्वार अजमासें वीस पंचवीस हजार कामास आले. श्रीमंत विश्वासराव साहेब व सदाशिवपंत भाऊ व

---

९२. भांडें=नलिकायंत्र. 'मांडें नाम महायंत्रं ' रा० व्य० को०–थोरलीं भांडीं= मोठ्या तोफा.

९३. आराबा=यंत्रव्यूह, तोफखाना.

९४. " बाण सुमारें तीस हजार " प्र० ३.

९५. 'उजवेकडे ' प्र० ३ व ४.

९६. 'सत्तर ' प्र० ४.

९७. 'ऐशी ' प्र० ३ व ४.

९८. जुंमस, जुमान, जूम=भय, धास्ती, दरारा.

९९–९९. ह्या बद्दल प्र० ३ मध्यें " एक राऊत व एक माणूस न फुटतां" असें आहे.

* शत्रूचा स्वार आपणांत येऊं न पावे.

१००. ह्मणजे " नजीबखान रोहिला " असें समजावयाचें.

१. 'साठ हजार ' प्र० ३.

२. अमित्र=शत्रु.

३. कामास येणें=लढाईंत पडणें, ठार होणें.

मल्हारजी होळकर व जनकोजी शिंदे व यशवंतराव पवार व अंताजी माणकेश्वर व अप्पाजी जाधवराव व विठ्ठल शिवदेव विंचूरकर, समशेर बहादूर वगैरे धारकरी व हुजरातीचे लोकांनीं व एकांडयांनीं[४] एकदांच सर्वांनीं श्री जाश्वनीळाचें[५] स्मरण करून व शाहू महाराज छत्रपति यांचें नांव घेऊन, हर हर महादेव!! ही गर्जना[६] करून घोडे घातले. इराणी दुराणी व अबदल्ली व सुजादौला व मनसूरअल्ली व अबदल्ली नादरशहाचे बेटे व दिल्लीपद बादशहाकडील खासे खासे बादशहाजादे व राठोड, रांगडे व रजपूत व मेवाती व हस्तनापूरवासी यांणीं "या अल्ला! खुदा या रहिमान रहिम[७]!" याचा उच्चार करून एकदांच नीट कमरग्यांत[८] शिरले. तेव्हां तीस हजार फौजेनिशीं जनकोजी शिंदे व समशेर बहादूर यांनीं त्यांजकडील सर्व फौज पोटीं घालून घोडे घातले. तेथें मोठी झोटधरणी होऊन वरकड हत्यारांची लढाई व तिरंदाजी ही राहिली. लढाईची हातघाई झाली. भाला व बिचवे व गुरगुंरजे[९] व जमदाडा व बाघनखें यांचे चपेटे फार झाले. एकमेकांच्या गळ्यास मिठ्या मारून पुढचे पाय पुढें टाकूं लागले. कोणी मागें फिरेना. सक्रोधं[१०] होऊन, अवसानें धरून एकमेकांवर पर्जन्यप्राय कोसळूं लागले. मल्लयुद्धाचें मारणेंच कडोविकडीचें परस्परें दाखवूं लागले. या युद्धांत वांचून पुनः दक्षणेंत जाऊन संसार करावा ही अरुता[११] कोणीं ठेविली नाहीं. कोणी महाकाल, कोणीं कृतांत असे भासले. कितीकांस मूर्च्छना येऊन रणभूमीस निचेष्ठित पडले. कितीकांचीं शरीरें त्या गर्दीच्या रंवदळींत[१२] चिरडून गेलीं. कितीकांचे हात पाय तुटून नुसते कोथळे रणांत राहिले. कितीक वीर भंबाळ[१३] होऊन भयंकर दिसूं लागले. कितीक वीरांच्या पाठींतून भाला ह्रदयापार होऊन आपआपले पुण्यानें कोणी विष्णुलोकास गेले, कोणी कैलासास गेले, कोणी सत्यलोकास गेले, कोणी इंद्रलोकास गेले[१४]. याप्रमाणें दुसरी लढाई सात तासपर्यंत झाली. मोठे मोठे सरदारांहीं

---

४. एकांडया=स्वतंत्र घोडेस्वार. ह्याची स्वतांची जमात नसते व कोणाच्या ताब्यांतही हा नसतो.

५. 'सांबाचें' प्र० १ व २.

६. 'हर हर महादेव व दिन दिन वाहून मोठी गर्जना रणवाद्यांची करून' प्र० १ व २.

७. 'या अल्ला या खुदा या रहिमान दिन् दिन्' प्र० ३.

८. कमरगा=मध्य (बाजूकडून).

९. गुरजा, गुर्गुज, गुर्गुजा=गदा. ताक करण्याच्या रवीच्या माथ्यासारखा ह्या शस्त्रास पोलादाचा माथा असतो.

१०. 'शस्त्रें सक्रोध०' प्र० १ व २.

११. अरुता=योग्यता, भीड, आशा.

१२. रंवदळ=चेंगराचेंगरी.

१३. भंबाळ=बंभाळ=रक्तबंभाळ=रक्तानें डवरलेले, लालभडक झालेले. प्र० ३ मध्यें 'कितीक रक्तबंभाळ' असा पाठ आहे.

१४. प्र० ३ 'यमसदनास' असेंही म्हणते.

व शिपायांनीं लढाईची शर्त केली. रक्तोदकें भूलिंगास अभिषेक झाला आणि शिरकमलें हींच भूलिंगास कमलें अर्पण जाहलीं. मल्हारराव रामचंद्र त्या रणांत आक्रंदत पडले होते. तें दुःख त्यांचे चिरंजीव गणपतराव मल्हार यांणीं डोळ्यांनीं पाहून, आपले पित्यास पुरे[15] करून, आपण आपला शिरच्छेद करावयास उदित झाले. ते समयीं सदाशिवपंतांनीं पाहून सगद्गद होऊन उत्तर केलें कीं, "आत्महत्या करूं नये. उदईक सर्व आपण इंद्रसभेस जाऊं." असें म्हणून राहविलें. सदाशिवपंताकडील व शत्रूकडील एकंदर माणूस पस्तीस हजार ठार पडलें. दहा बारा हजार घोडा मोकाट फिरूं लागला ! मदोन्मत्त हत्ती पाउणशें रणप्रसंगीं पडले. इराणी दुराणी वगैरे शत्रूकडील उंट नफर दोन हजार कारखान्याचे जायां झाले. याप्रमाणें संग्राम महाधुरंधर जाला. या युद्धांत बळवंतराव गणपतराव मेहेंदळे यांजवर वार पडला. त्यांचे मुर्दावर मोठी गर्दी गुजरली. तें सदाशिवपंतभाऊनीं पाहून, घोड्याखालीं उडी टाकून, दोहों हातीं पट्टे चढवून, जिवाची तमा न धरितां धीट होऊन नीट फौजेंत चालून घेतलें. कत्तल करीत चालले. ते समयीं जनकोजी शिंदे व त्र्यंबकराव मार्तंड व सदाशिवपंत पुरंधरे व महिपतराव चिटणीस व विठ्ठल शिवदेव व फकीर महंमद व फिरंगोजी पवार व राणोजी जाधवराव, आप्पाजी[16] जाधवराव व धर्माजी पासिलकर[17] व संताजी आठोळे व नरसोजी खैरात व हैबतराव सालसकर[18] व सयाजी पायघुडे व नरसाजी बिरजे व गुणाजी भापकर व लिंगोजी केशव व सदाशिव आप्पाजी व जानमहंमद व भागोजी उफळे व इंद्रोजी रसगळ व रस्तुमराव पांढरे व इंद्राजी कदम व बळवंतराव सासवडकर या सर्वांनीं घोड्याखालीं उड्या टाकून पाय उतारा[19] झाले. मागें पुढें पाहिलेंच नाहीं. तेथें मारामारी कांहीं सामान्य झाली नाहीं. ते समयीं स्वर्गीं इंद्रलोकींचे इंद्र सुद्धां सुरगण विमानांत बसून अंतराळीं पहावयास आले. धन्य त्या वीरश्रीवैभवाची ! बळवंतराव यांचा मुर्दा बळजोरीनें सदाशिवपंतांनीं आपले जमातींत आणिला. मर्दुमकीचा वहमा इराणीचा जिरला. त्या सपाटयांत सदाशिवपंत भाऊंकडील व इराणीकडील व दिल्लीपत बादशाहाकडील व सुजातदौले व मनसूर अल्ली व हस्तनापूरवासी यांजकडील खांसा खांसा मोहोरा एका

---

१५. पुरे करणें=(अर्धवट मृत होते ते) पुरे मारणें.

१६. अप्पाजी जाधवाचें नांव प्र० १ व ४ मध्यें नाहीं.

१७. 'पाठाळकर' 'पाबळकर' पाठ भेद.

१८. 'सोळसकर' पाठ प्र० ३ व ४.

१९. प्रती १ व २ यांत या शब्दा पुढें असें आहे "होऊन मोठे नेटाची तरवार करून जवामर्दीनें पंत मशारनिल्हेचें प्रेत बाहेर काढून आपले जमातींत आणिलें. वीरश्रीवैभवाची शर्त झाली."

साटांतील जेवणारा साडेसातशें कामास आला. यांणीं[20] इराणी दुराणीचा मो-होरम[21] केला. वीरांच्या मर्दुमीचा कळस जाहला! एवढी लढाई जाहली परंतु कांहीं तफावेत[22] पडली नाहीं! याजकारितां इराणी दुराणी अंतरीं दिलगीर होऊन म्हणूं लागले कीं, "दखनी मराठे लोक बडे हरामजादे! तरवारीस आपणास ऐकत नाहींत. बादशाही लियाबिगर हं बी पीछे जानेके नही. सब सलतनतें[23] समेत हक्क[24] होना ये अच्छा." असें म्हणोन फिरून चालू येण्याची उमेद धरावी तों एवढ्यांत सदाशिवपंतांनीं कुतरतोड[25] करून सर्व शत्रूंस आपल्या लष्करांत शर्तबेशर्त करून दामटून घेतलें[26].

इकडे सदाशिवपंत आपल्या लष्करांत जाऊन नामी नामी धारकरी व सरदार व पागे व पतके व गाड्यांतील जमातदार पडले होते ते रणांतून शोधून काढून कोणास पुरविलें, व कोणास अग्नि-डाग दिले, व ज्यांची ओळख पुरली नाहीं असे जे सरदार चाकरमाने होते त्यांस एकेक्या गर्तेत शेंपन्नास व शेंदोनशें घालून खांचा बुजविल्या. ब्राह्मण मंडळीस शेले दीड हजार कफनास[27] लागले. या कलियुगीं दुसरें प्रत्यक्ष भारती युद्ध झालें[28]. इराणी दुराणी व दिल्लीपत बादशाह वगैरे यांनकडील व सदाशिवपंत भाऊकडील लोकांविषयीं व घोडेस्वारांविषयीं व तोफखान्यांविषयीं व पायदळाविषयींची बहुत खराबी जाहली ती लिहितां पुरवत नाहीं. पेशवे बहादूर यांजकडील थोर थोर सरदार व मानकरी व एकाण्डे व धारकरी व हुजरातींतील लोक पडले, त्यांची नांवनिशी मात्र लिहिली. इराणी दुराणी दिल्लीपत बादशहा वगैरे यांजकडील लोक पडले त्यांची नांवनिशी ल्याहावी तर या कलियुगीं दुसरें भारत होईल, याकारितां श्रीमंतांकडील लोक लिहिले गेले त्यांची नांवनिशी तपसीलवार अशी कीं:—

| | | |
|---|---|---|
| १ बळवंतराव गणपत. | १ कृष्णाजी मोरे. | १ सोनजी शिरके. |
| १ गंगाधर नारायण. | १ चिमणाजी वाळके. | १ नारो हरी. |

---

२०. यांणीं=मराठ्यांनीं.

२१. मोहरम=मोहरमच्या कत्तलेसारखी कत्तल.

२२. तफावत=फरक, कमताई.

२३. सलतनत=सर्व फौज किंवा राज्य.

२४. हक्क होणें=मरणें.

२५. कुतर-तोड=घाईंत घाई, निकड.

२६. या वाक्याबद्दल प्रत ३ मध्यें असें आहे, "ऐसें म्हणोन सदाशिवपंतांनीं इराणीस त्याच्या गोटापर्यंत धकाऊन घातला होता तो माघारा परतला."

२७. कफनास म्हणजे शेवटच्या संस्कारास.

२८. या शब्दा पुढें प्र० ३ मध्यें "भाऊसाहेबांनीं भूलिंगाची पूजा आरक्त नरांचीं शिरकमलें आणून केली" असें, व प्र० ४ मध्यें "सदाशिवपंताकडील पंधरा सुवासिणी यांणीं बेले करून रक्त कुंकुमचर्चिले भाळीं मानवाची शिरकमळीं पूजा केली' असें वाक्य आहे.

१ बाळाजी भोईरे[२९].
१ नारायणसिंग रेडे.
१ शिवराव अंबीकर.
१ अमृतराव चवळे[३०].
१ जयाजी[३१] भालेकर.
१ दयाळ सिंग.
१ सिधोजी भोंसले रुजू शेवळे[३२].
१ तुकाजी[३३] गाढवे.
१ सयाजी थोरात.
१ हणमंतराव शितोळे.
१ हरजी रणदिवे.
१ हणमंतराव मोचेले[३४].
१ पदाजी मोहिते.
१ लक्ष्मणराव मानगिरे[३५].
१ रहिमान गोरी.
१ नरसिंगराव चोपडे.
१ भिकाजी रासळे.
१ भिवराव[३६] पवार.
१ भिकाजी नळवडे.
१ कृष्णाजी विष्णू.
१ कमाजी[३७] सुरवे.

१ लखमाजी गोडे.
१ सिदोजी घारघे.
१ मल्हारराव कोतकर.
१ बाहिरराम रजपूत.
१ मानाजी रणदिवे.
१ गिरजोजी देवळे.
१ आनंदराव माने.
१ मलकोजी माने.
१ लखमाजी सांवत.
१ जावजी दमेकर.
१ बयाजी शिरके.
१ गंगाजी दाभाडे.
१ रामराव साटमे[३८].
१ येशवंतराव वाघ.
१ सिदोजी थोरात.
१ कर्णोजी पाळेकर[३९].
१ हटेसिंग.
१ शंकाजी कांटे.
१ संताजी वाघ.
१ रामराव शिरके.
१ शिवराव कडु.
१ रामराव घुगरे.

१ समजाजी[४०] वागवे.
१ मोराजी पडवळ.
१ अमृतराव[४१] मोरे.
१ निळकंठराव माने.
१ रामराव शेणे[४२].
१ यमाजी शिरोळे[४३].
१ भुजावरसिंग.
१ धोंडजी पवार.
१ शिवजी शेळके[४४].
१ पिलाजी नवरे[४५].
१ दुल्लभजी पालेकर[४६].
१ मानाजी रणनवरे.
१ अप्पाजी जिरगे.
१ रामराव काळे.
१ यमाजी राजेगिरे[४७].
१ लखमाजी गाजरे.
१ सयाजी माने.
१ रामराव माने.
१ तुकाजी थोरात.
१ बापुजी काटेकर[४८].
१ सयाजी गुर्जर[४९].
१ लिंगोजी थोरात.

---

२९. ‘मोइटे’ प्र० ३ व ४.
३०. ‘चवरल’ ‘चवाणे’ पाठ.
३१. ‘सयाजी प्र० ३.
३२. ‘संताजी शेवळे’ ‘ढवळे’ पाठ.
३३. ‘भिकाजी’ पाठ.
३४. ‘माचेले’ असेंही होईल.
‘माटपले’ ‘मोरे’ पाठ.
३५. ‘मानदिवे’ पाठ.
३६. ‘जीवराव’ पाठ.
३७. ‘कान्होजी’ पाठ.
३८. ‘साटलवे ‘साटब’ पाठ.
३९. ‘पाटेकर’ पाठ.
४०. ‘समनाजी बागले ‘ संभाजी बागडे’ पाठ.
४१. ‘आबाजी’ ‘अबलोजी’ पाठ.
४२. ‘राळे’ ‘करळे’ पाठ.
४३. ‘दुरोळे’ ‘सारोळे’ पाठ.
४४. ‘शेळके’ असेंही होईल.
४५. ‘जवरे’ असेंही होईल.
४६. ‘दुलबाजी घालेकर’ पाठ.
४७. ‘राजगिरे’ असेंही होईल.
४८. ‘कोटकर’ असेंही होईल.
४९. ‘गुजरे’ ‘सघाजी गुरजे’ पाठ.

१ सदाशिव राजे.
१ बाबाजी घुगरे.
१ मुकूब शाँस.[५०]
१ सखाराम मोरेश्वर.[५१]
१ काशिराम सोंडंगे.[५२]
१ गोपाळराव शेळके.
१ पोर्थाराम रजपूत.
१ यमाजी गोफणे.
१ रंगराव शिंगाडे.
१ अमलशहा.[५३]
१ गणोजी माजरे.
१ शिदोजी कापशे.
१ आप्पाजी पोवळे.[५४]
१ यशवंतराव भापकर.
१ जावजी जाधव.
१ भानाजी मोरे.
१ संताजी नळगे.
१ म्हसाँजी[५५] मोरे.
१ मल्हारराव शिंदे.
१ मर्णाराम रजपूत.
१ अप्पाजी हळंदे.[५६]

१ लिंगाजी कुराडे.
१ कृष्णराव पवार.
१ बिरदाजी पवार.
१ हरी विठ्ठल.[५७]
१ अप्पाराव बांडे[५८].
१ भिवराव हरी.
१ सटवाजी पिसाळ.
१ देवीदास रजपूत.
१ पद्माजी पाटणेकर.[५९]
१ सयाजी म्हसके.
१ विठ्ठलराव हरी.
१ सदाशिव गोपाळ.
१ विठ्ठलराव पांढरे.
१ धावजी माने.
१ भरमाजी[६०] वाघ.
१ नरसो व्यंकटेश.
१ जोत्याजी[६१] रणनवरे.
१ रंगराव बांडे.
१ यमाजी भापकर.
१ चिंतामणराव.
१ गंगाजी शिंगाडे.

१ शिधोजी नवरे.[६२]
१ यमाजी टकले.
१ मल्हारराव वाघ.
१ दामोदरसिंग.
१ सयाजी आंभळे.[६३]
१ भवानजी सोनवणी.[६४]
१ चिंतामणराव गोविंद.
१ चिंमणाजी विठ्ठल.
१ येशवंतराव[६५] भोगले.
१ जावजी[६६] माने.
१ सिदोजी साळवी.
१ बाजीराव मोहिते.
१ यमाजी सुरगे.[६७]
१ नारायणराव पांढरे.[६८]
१ मानाजी बांडगे.
१ नवसोजी वाळवेकर.
१ मुल्हारराव धुमाळ.
१ माधवराव पाटणकर.
१ लक्ष्मण शिवदेव.
१ जगन्नाथ मल्हार.
१ गणेश रामचंद्र शिरोळे.

---

१३४ असामी.

येणेंप्रमाणें सरदार मातबर* दहा हजारांचे व पांच हजारांचे व पांचशांचे व

---

५०. ‘ मुकुंदराव ’ पाठ.
५१. ‘ मोरे ’ पाठ.
५२. ‘ तोंडले ’ ‘ तोगे ’ पाठ.
५३. ‘ अमदशहा ’ पाठ.
५४. ‘ रावळे ’ ‘ पावळे ’ पाठ.
५५. ‘ हणमाजी ’ पाठ.
५६. ‘ हवदे ’ ‘ होळपे ’ पाठ.
५७. ‘ हरी विसाजी ’ पाठ.
५८. ‘ बंडळ ’ पाठ.
५९. ‘ दमाजी ’ पाठ.
६०. ‘ वरमाजी ’ पाठ.
६१. ‘ संताजी ’ पाठ.
६२. ‘ जवरे ’ ही होईल.
६३. ‘ सयाजी नाभळे ’ ‘ मापाजी जांभळे ’ पाठ.
६४. ‘ भिवाजी सानवळे ’ पाठ.
६५. ‘ जयवंतराव ’ पाठ.
६६. ‘ भीवजी ’ पाठ.
६७. ‘ दुर्गे ’ पाठ.
६८. ‘ पोंवार ’ पाठ.
* मातबर=थोर थोर.

सातशांचे व शें दोनशांचे असे ठार झाले. या वेगळे दोनतीनशें जखमी जहाले. ते वांचतां कठीण आहे. पायदळापैकीं बत्तीस सहस्त्र माणूस कामास आलें. या प्रकारचें रणकंदन झालें. घे घे मार ऐशी ध्वनी उठूं लागली. युद्ध दारुण झालें. अबदल्ली व इराणीकडील व मनसूर अल्लीकडील व सुजातदौले यांजडील खासे खासे सरदार पडले, त्यांचीं नांवनिशीं तपशीलवार असामी बितपशील:—

| | | |
|---|---|---|
| १ खिरखान रयाजी. | १ धर्माजीसिंग. | १ चंदीरखां पठाण. |
| १ गोरखान जी ब कल. | १ भुनावरसिंग रजपूत. | १ अजमतदौला. |
| १ महंमद हुसेन. | १ गलेफखां पठाण. | १ गुलाबखां पठाण. |
| १ जिराइतखां पठाण. | १ लाडखां पठाण. | १ किराईरुजु संभासिंग. |
| १ अबदूलखां पठाण. | १ तमालखां पठाण. | १ बळरामसिंग. |
| १ अनवारीखां पठाण. | १ दाउदखां पठाण. | १ फतेखां गोरी. |
| १ अमृतराव पवांर. | १ इजाफतखां पठाण. | १ लक्ष्मण महादेव. |
| १ अर्जुनसिंग परदेशी. | १ दुदुखां पठाण. | १ माधवसिंग. |
| १ रुस्तुमखां पठाण. | १ फत्तेसिंग. | १ मीरखां पठाण. |
| १ मुसायदखां पन्हीपठाण. | १ इजावतखां पठाण. | १ गाजरखान पठाण. |
| १ गयालखां पठाण. | १ दाउदखां पठाण. | १ हटेसिंग. |
| १ भिकाजी रांम. | १ लालखां पठाण. | १ चांदखां. |
| १ अनसिंग मारवाडी. | १ मजितखान पन्ही. | १ खान रस्तखां. |
| १ दाउदखां. | १ गंगासिंग. | १ भीमसिंग हजारी. |
| १ दावलखां गोरी. | १ घेलासिंग. | १ मनीखां पठाण. |
| १ निजामखां. | १ हुसेनखां पठाण. | १ खानम्यांजखां. |
| १ इमामखां खंदारी. | १ बद्रीजमालखान. | १ रूपखान पठाण. |
| १ फकीर दाउद. | १ किराईतखां. | १ रूपासिंग. |
| १ धनसिंग रजपूत. | १ गलेफखान रयाजी. | १ शादुल्लाखां. |
| १ केशवसिंग. | १ सुलतानखां पठाण. | १ शामकाठी. |

—

६० असामी.

---

६९. हा शब्द प्र० ३ व ४ मध्यें मात्र आहे.

७०. हा मराठा किंवा रजपूत ?

७१. 'राव' प्र० ३.

* 'दाउचीबेग' प्र० ३.

७२. 'बाळराम' प्र० २.

७३. हा मराठा असावा.

७४. 'हाकेसिंग' प्र० ३.

७५. 'खानमयाना' प्र० ३.

येणेंप्रमाणें नामी नामी सरदार दहा पांच हजारांचे व हजार दोन हजारांचे व चारशें पांचशांचे अमित्राकडील ठार पडले. व मनसूरअल्ली व सुजातदौला व अबदल्ली व हस्तनापूरवासी यांजकडील लोक पडले. त्यांची गणना लागली नाहीं. अजमांसे पठाण वगैरे तीस हजार ठार झाले. दिल्लीपद बादशहाचे वकिलांनीं टीप लिहून सदाशिवपंत भाऊंस दाखविली व सदाशिवपंतांकडील वकिलांनीं याद पडल्या लोकांची नांवनिशीवार इराणी व दुराणी व मुख्य बादशहा दिल्लीपती यांस दाखविली. याप्रमाणें दुतर्फा नाश बहुत झाला

इराणी अंतर्यामीं हिय्या न सोडितां सुजातदौला व मनसूरअल्ली यांस बोलला कीं, " बम्हननें बडा गजप किया ! मराठे बडे जोरदार हटेले ! आटपले जातात असें दिसत नाहीं. सलूख करावा ये अच्छा. इस बातमे खुबी है. " असें बहुत प्रकारें सांगितलें. त्याजवरून त्या उभयतांनीं सलूखाचें सदाशिवपंत भाऊंकडे सूत्र लाविलें. परंतु सदाशिवपंत भाऊंच्या चित्तांत सर्वथा सलूख करावयाचा नाहीं. त्यांचीं हत्यारें हिसकावून घेऊन देशोयडी करावें[७७] हाच निश्चय. दुसरा अर्थ नाहीं.

पहिले लढाईंत, दुसरे लढाईंत व तिसरे लढाईंत जे जे सरदार नामी नामी व धारकरी व एकाण्डे व हुजरातीचे लोक व शागिर्दपेशा[७८] व राज्यमंडळीचे मानकरी पडले त्यांस तर मूठ माती दिली; व घायाळ जखमी होते त्यांस औषधपाणी तबीबां[७९] पासून करवावें त्या उस्तावरींत भाऊसाहेब एक महिना लागले. तसेंच दिल्लीपद बादशहा व इराणी दुराणी व हस्तनापूरवासी इत्यादिक उस्तवारीस लागले. सदाशिवपंत भाऊ व विश्वासराव साहेब या उभयतांनीं जखमी लोकांच्या दिवसांतून एक वेळ राहुटीस स्वतःपायउतारां जाऊन समाचार घ्यावा, याप्रमाणें पंथ चालविलीं[८०]. व जखमा बऱ्या झाल्या त्या शिपायांस पाणी घालून, नवीन बक्षिसें देऊन, संतोष करून हुशार केलें.

परंतु दाणावैरणीकरितां पेशवे बहादूर मोठ्या फिकीरींत पडले. लष्करा भोंवतीं दोनशें कोस उजाडी पडली. उपाय चालेनासा जाहला. शत्रूच्या लष्करांत यमुने पलीकडून हर जिन्नस येत होता. कांहीं तोटा नव्हता. सदाशिवपंत भाऊंस मात्र मोठें संकट पडलें. त्याकाळीं गोविंदपंत बुंदेले मामलेदार प्रांत सागर निसबत पंतप्रधान यांणीं खजीना व दाणा भरून समागमें फौज रख-

---

७६–७६ हें वाक्य प्र० ३ व ४ मध्येंच आहे.

७७. 'लावावे' प्र० २.

७८. शागिर्द-पेशा=शिष्य मंडळ, परिचारक मंडळी.

७९. तबीब=वैद्य, शस्त्रवैद्य.

८०. हें भाऊंचें वर्तन ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. लोकांची आस्था त्यांस कशी होती हें याजवरून ध्यानीं येईल.

चाळीस षंधरा हजार घेऊन खाविंदाचे कुमकेस जावें असा सिद्धांत करून निघाले. ही बातमी शत्रूच्या लष्करांत दाखल होतांच पाळथ राखून, शास्तेखां व झुलपुकैरखां हे दोघे सरदार पाठवून, यमुनापार होऊन, सूर्योदयाचे समयीं एके रात्रींतून च्याळीस कोस येऊन छापा घातला. तेथें मोठी लढाई झाली. परंतु बुंदेले यांजकडील फौज बेसावध होती याजमुळें गिलचानें लढाई देऊन पंत मशारनिल्हेचें शीर कापून नेलें, आणि ताटांत घालून भाऊसाहेबांकडे नजर पाठविलें. त्याचें वर्तमान असलें वाईटपणाचें भाऊंनीं प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहून केवळ कंबरच बसली. बुंदेले यांची स्त्री समागमेंच होती तिनें प्रेताबरोबर सहगमन केलें आणि दिवसेंदिवस अन्न मिळेनासें जाहलें. चार चार फांके पडूं लागले. घोड्यास दाणा वैरण अगदींच मिळेनाशी झाली. मग महर्गतेची वार्ता त्यांनीं श्रवण करून सलूखाची वार्ता व युद्धाची तयारि करणें ही गोष्ट अगदींच टाकिली. चलबिचल न करितां थंड[3] राहिले. भाऊसाहेब मोठ्या संकटांत पडले. तीन उपोषणें सारे लष्करास घोड्या माणसांसुद्धां पडलीं.

तेव्हां मल्हारजी होळकर व जनकोजी शिंदे व दमाजी गायकवाड व यशवंतराव पवार व अंताजी माणकेश्वर व संताजी आटोले वगैरे लहान थोर मिळून सदाशिवपंतांशीं विचार करावयास आले. तों सदाशिवपंत भाऊ व विश्वासराव साहेब बिचव्यांत[4] बसले होते, तेथून कचेरीच्या डेऱ्यांत येऊन खलबतास बसले. तेव्हां सर्वांनीं सांगितलें कीं, “ आज सव्वा महिन्यांत तवाई[5] सर्वांनीं सोसली. अन्न पाण्यावांचून घोड्यां माणसांचे प्राण जातात. पुढें महाराज काय तजवीज सांगणें ती सांगावी ! अन्नावांचून हात पाय सुजले. तरवार कोणत्या रीतीनें करावी ? साहेबीं[6] आजपर्यंत यश संपादून शत्रू पादाक्रांत केला. आंतां[7] सर्व दौलत बुडवून नाश आरंभिला. दुसरें कांहीं एक नाहीं. विनाशकाळासारिखी तुमची बुद्धि झाली. आपणांबरोबर आम्हां सर्वांचीं घरें बुडतात. आमचीं रांडापोरें आमच्या डोळ्यां देखत इराणी घेऊन जातो, असा समय प्राप्त जाहला. तुमचे बुद्धीस भ्रंश झाला, म्हणून आपण तिळमात्र कोणाचें ऐकत नाहीं. उगीच हेका केला तो या समयीं फळास आला. सारांश आपण सर्वांचें मान्य करून

८१. हीं नांवें चुकीचीं असावीं. ह्या नांवाचे सरदार मागें शिवाजी व राजाराम यांच्या वेळेस अनुक्रमें प्रसिद्ध होते.

८२. त्यांनीं=अमित्रांनीं, शत्रूंनीं.

८३. गिलच्याच्या शौर्यापेक्षां ह्या युक्तीचा त्यांस मोठा उपयोग झाला. जो पेंच नेहेमी मराठे आपले शत्रूवर घालीत तोच पेंच कालवशें त्यांजवर पडला.

८४. बिचवा, बिचोबा=लहान तंबू, याला काठी नसते.

८५. तवाई, तवई=संकट.

८६. साहेबीं=स्वामींनीं.

८७. ‘ केला असतां ’ प्र० १.

सलूख करून देशीं गेलें म्हणून गांडू जाहलों असा अर्थ नाहीं. या हटानें सर्व लयास गेलें. कांहीं आहे तेंही जाणार. नकळे ईश्वराची महिमा. होणार [ त्या ] सारखी बुद्धि उत्पन्न होते. विचार हरल्यामुळें नैषधास व श्रीरामचंद्र-जीस अपाय घडला, तसा प्रकार आपणासही घडोन आला. तुम्हांस श्रीसांबा-नें अजरामर ऐश्वर्य दिलें असतां, भाऊसाहेब! तुम्हीं बुडविलें. आज तो प्रसंग प्राप्त झाला. सुबुद्धि सांगतां तुम्हांस श्रम वाटतात. पुढें कर्माची गति दुस्तर ओढणार त्यासारखें घडोन येतें. 'होणार तें कधीं चुकत नाहीं,' ऐसी वडिलीं म्हण आहे." ते वेळेस जनकोजी शिंदे यांणीं दृष्टांत दिला कीं, "रावणास श्रीसांबानें चवादा चौकड्यांचें राज्य करणें म्हणून वर दिला असतां, श्रीसीता-देवी आणिल्यामुळें सर्व राज्य बुडविलें. बिभीषण आणि कुंभकर्ण वगैरे मंडळींनीं मंडोदरीसुद्धां सीता देण्याविषयीं उपदेश केला. परंतु कोणाचें न ऐकतां लक्ष पुत्र व सव्वालक्ष पौत्र व ऐशीं सहस्र स्त्रियां सहित कुलक्षय केला. त्याप्रमाणें भाऊसाहेब! तुम्हीं केलें." त्याजवर मल्हारराव होळकर यांणीं दृष्टांत दिला जे, "द्वापारयुगीं राजा दुर्योधन शत बंधूंसहित राज्य करीत असतां द्रौप-दीमुळें सर्व राज्य लयास गेलें. ते काळीं व्यासांनीं व विदुरांनीं व श्रीकृष्ण परमात्मा यांनीं बहुत प्रकारें सांगितलें. परंतु राजाचें म्हणणें कीं, 'सुईच्या अग्रीं मृत्तिका देणार नाहीं.' या हट्टामुळें मार्गशिर्ष वद्य ३० अमावास्या सायं-काळीं राजा दुर्योधन गदायुद्धांत पडोन राज्य हारविलें. तसेंच भाऊसाहेब! आपणांस घडून आलें. आतां अंत राहिला नाहीं. तुमच्या लष्करची खराबी दुराणीस कळली. आतां सर्वस्वी बुडवितो. काळचक्रांत सर्व पडलों. उत्तम गोष्ट बनून न आली. पहिल्यानेंच सलूख संपादिला नाहीं, आतां दुराणी तुम्हांस खातरेंत आणीत नाहीं. तुम्हीं हेका केल्यामुळें दौलत सारी बुडली. या समयीं याठायीं श्रीमंत राजश्री नानासाहेब असते तरि कसच्या गोष्टीचा हेका न करिते. तुम्ही प्राणानिशीं जातां. तुमचे चित्तांत असें येत असेल, दुराणीचा मजकूर किती? मारून धुडकावून देऊं. हीं गोष्ट सांगतां खरी. परंतु तो प्रसंग आतां नाहीं. हा जीव तुमचे अन्नाचा या प्रसंगीं खर्च जहाला असतां

---

८८. 'गेलां म्हणून गांडू ठरलां' पाठ.

८९–८९. ह्या शब्दांबद्दल "या कुरुक्षेत्रीं हाच मास हाच दिवस विक्रमनाम संवत्सर पौष शुद्ध ८" असे शब्द प्र० ३ व ४ मध्यें आहेत. कौरव पांडवांच्या युद्धास मार्गशीर्ष शुद्ध १५ च्या सुमारास प्रारंभ होऊन पौष शुद्ध ३ स दुर्योधन पडला, असें भारतावरून होतें.

९०. 'घडून येतें असें दिसतें' प्र० ३.

९१. 'सर्व सांपडलों' प्र० ३.

९२. 'बनूं न आली' किंवा 'बनून आली' असें ही कदाचित् होईल.

९३. 'तरि काजकरिते, प्र० ३.

९४. हें वाक्य प्र० ३ मध्यें आहे.

चांगला, परंतु अगोदर अन्नावांचून डोळ्यांपुढें अंधाऱ्या येतात. तेव्हां युद्धाची वार्ता कशी करावी ? आतां जीविताची तमा धरून रांडापोरें वांचतात असा अर्थ नाहीं. तुम्हीं सर्वांचा घात केला. आपल्या हातें सर्व वैभव बुडविलें. आमच्या डोळ्यां देखत आमचीं रांडापोरें गिलचा बाटवितो. तें दुःख प्रत्यक्ष दृष्टीनें पहावें. आपण आपला कुटुंबघात आपल्या देखत करून उद्यांच्या लढाईंत आम्ही सर्व प्राणानिशीं गेल्यानें आपली स्वारी फत्ते होते कीं काय ?"

अशा प्रकारचीं सर्व समुदायाचीं उत्तरें जिकीरीचीं रायांनीं ऐकून घेऊन प्रति-उत्तर दिलें कीं, "होणारास उपाय काय ? कोणीं आपण आपलें अनिष्ट चिंतीत नाहीं. दैवगतीनें घडून आल्यास उपाय कोणाचा ? यश किंवा अपयश महाराज छत्रपतींकडे. आतां शरीर तृणप्राय मानून, मर्दुमीचा हिय्या न सोडितां, समशेरीची शर्थ करून दाखवावी. कौरव पांडव सकल सेने सहित कुरुक्षेत्रीं धारातीर्थीं सुस्नात झाले, तदनुरूप आपण ही व्हावें. या परता पराक्रम कोणता ? सर्व सत्ता श्रीकैलासनाथाची ! त्याप्रमाणें घडून येतें. दूषणें लावितां तीं प्रमाणच. गेल्या गोष्टी पुढें येतात असें नाहीं. प्रस्तुत पुढची विचारणा चित्तांत आणून यश छत्रपतींचें सांभाळावें. हें यश तुम्हा समस्तांचें आहे ! निदानसमयसागरतारक पिनाकपाणी आहे, मग इराणीची तमा ती काय ? आतां भय धरल्यानें काय होतें ? श्रीसांबकृपेनें इराणीस मारून गर्दीस मिळवून देऊं. सत्कीर्ति करून मरावें या भूषणापरतें दुसरें काय आहे ? उद्यां सर्वांनीं खंदकपार होऊन मारतां मारतां कटून मरावें. या भूषणा परतें दुसरें काय आहे ?" हा निश्चय सदाशिवपंतांनीं करून सर्वत्रांस विडे देऊन बोळविलें.

नंतर विश्वासराव साहेब व सदाशिवपंत पुरंदरे व महिपतराव चिटणीस व बाबा फडणीस यांचे चिरंजीव नाना फडणीस व अप्पाजी माधवराव व

---

१५. 'उमेद कशी धरावी ?' प्रत ३.

१६–१६. हे शब्द प्र० ३ मध्यें नाहींत.

१७. 'बाटवितो यांत संदेह नाहीं' प्रत ३.

१८. या शेवटल्या वाक्याबद्दल प्र० ३ मध्यें असें आहे. "देहांत जीव आहे तों मारतां मारतां मरावें. यश श्रीनें दिलें तर घ्यावें. नाहीं तर सर्वांनीं द्यावें [ ? ] तलवार अंगीं करून मर्दुमी करावी. जीवंत असतां वैरियानीं यश घ्यावें असा मराठ्यांचा स्वधर्म नव्हे. रांडापोरें आपलीं आपल्या देखत शस्त्रानें साफ करावीं. जर करितां श्रीनें तुम्हांस यश दिल्यास कीर्ति होईल. साऱ्यांनीं असा निश्चय करून तुम्हांजवळ अलों आहों." तथापि वरच्या मजकुराशीं हें चांगलेंसें जमत नाहीं.

१९. 'सुरनाथ' प्र० २

१००. 'या परता मनोभाव दुसरा नाहीं, प्रत ३.

१ 'करून लहान थोर सरदारांची क्रिया घेऊन' प्र० २ व ३.

अंताजी माणकेश्वर व रामाजी अनंत दाभोळकर व समसेर बहादूर व सदाशिव अप्पाजी पागे दिमत सुलतानखां वगैरेचें ममतेचें मंडळ एकांतीं घेऊन त्यांस विचारलें कीं, "समय तर तुटक व दुर्घट प्राप्त झाला. प्राणावर येऊन बेतली. होणार तेंच घडून येतें. चिरंजीव विश्वासराव साहेब, तीर्थस्वरूप नानासाहेबांचे व सौभाग्यवती गोपिकाबाईंचे प्राणांचेही प्राण! अगोदर विश्वासराव साहेब यांस आमचे बरोबर पाठवीत नव्हते. सौभाग्यवती गोपिकाबाई साहेबांनीं माझे मनोधारणास्तव [पाठविले व] विश्वासराव साहेब आमचे ममतेस्तव हेका करून स्वारीस आले. आणि आतां तरि गोष्ट अनुचित बनून आली. विश्वासराव साहेब! तुमचें वय लहान. तुम्हीं सुखाची जाति तिलप्राय अनुभवली नाहीं. तुम्हांसारखे सगुण पुत्र, उभयतांची ममता तुमचे ठायीं विशेष, असें असतां हें महत्तर अपेश श्रीसांबानें माझे विभागास आणिलें." असें बोलतांच भाऊसाहेबांच्या नेत्रांस पाणी आलें कीं, "रावसाहेब! तुम्हांस मीं मरणाचे घरीं आणिलें. ही गोष्ट सर्वोपरी आमचे पासून गेली!" ऐसीं भाषणें ऐकून सर्वांस गहिंवर आला. त्याजवर विश्वासरायांनीं उत्तर केलें कीं, "माझे प्राणांविषयीं मनला तिलमात्र काळजी वाटत नाहीं. परंतु हा समय आपल्यावर गुजरला. मागें नानासाहेब तुम्हांवांचून घटकाभर प्राण ठेवणार नाहींत! आपण उभयतां बंधु, एक धर्मराज व एक अर्जुन, किंवा एक श्रीरामचंद्र किंवा एक भरत, याप्रमाणे पराक्रमी असतां हा प्रसंग घडून आल्यास श्रीमंत नानासाहेबांची काय गति होईल ती कळेना. तुम्हीं उभयतां बंधु कायम असल्यास माझे सारिखे पुत्र बहुत होतील! " ऐशीं उदासपणाचीं भाषणें विश्वासरावाचीं राव भाऊंनीं श्रवण करून विश्वासरावास आलिंगन देऊन बहुत श्रमी जहाले. भाऊ साहेब म्हणूं लागले कीं, "आम्हीं तरि सतीचें वाण घेतलें, आतां तुह्मांस ईश्वर साह्य आहे." त्याजवर विश्वासरावांनीं उत्तर केलें कीं, "आपण वडील संनिध असतां मला भय काय? त्यांतून ईश्वरी इच्छेंकरून ही गोष्ट बनून आली असतां दुसरा पराक्रम जन्मास येऊन कोणता करावा? आतां प्रतिज्ञा हीच कीं रूमशामची बादशाहत करून रूमशाम येथील सरदेशमुखीच्या वतनाचीं वस्त्रें श्रीछत्रपतीं-

---

२. प्र० १ मध्यें "नाना साहेब अगोदर विश्वासराव यांस आमचे समागमें पाठवीत नव्हते" असें आहे.

३. हें ह्या प्रसंगाचें वर्णन वाचून कोणाचें हृदय द्रवणार नाहीं? ज्याच्या पुढें सहस्र संकटें एकदम उभीं ठाकलीं असतां जो तिळमात्र डगमगला नाहीं, तो सदाशिवराव पुत्रमोहामुळें विश्वास रायास पाहून ढळढळां रडला! धीरोदात्त पुरुषांचीं अन्तःकरणें वज्रा पेक्षां कठोर व कमला पेक्षां मृदु असें ह्मणतात तें खरें.!

४. हे विश्वासरायाचे बोलही त्या राजपुत्राच्या अनुरूप असून गळा दाटविणारे आहेत.

च्या नांवें घेऊनै, आजपावेतों हक्काचा ऐवज राहिला आहे तो घेऊन ढाला माघाऱ्या देऊं! नाहीं तरी जो प्राणी जन्मास आला त्यास तरि मृत्यु आहे. परंतु या कुरुक्षेत्रीं रणांगणाचेठायीं पराक्रम करून मृत्यु आल्यास दुसरें काय पाहिजे? याजकरितां मजविषयीं अणुमात्र चित्तांत कांहीं एक आणूं नये. जें ईश्वरानें नेमिलें असेल तें कदापि टळावयाचें नाहीं. मग खेद करावयाचें कारण कोणतें? नाना साहेबांहून मला तुम्ही वडील अधिक! त्यापेक्षां श्रमी होऊं नैये." तेव्हां समस्त सैनिकांस निश्चयात्मक कळलें.

ते दिवशीं सदाशिवपंतांनीं व विश्वासराव यांणीं कडकडीत निर्श्चक्र केलें. उदकही घेतलें नाहीं. रात्रीचे ठायीं विश्वासराव साहेबांनीं व राव भाऊंनीं साखर, बतासे, फळफळावळ मात्र भक्षिली. तों मध्यरात्रीचा समय जहाला. तीन प्रहरांचा समय होतांच उभयतांनीं निद्रा संपादिली. कांहीं निद्रा लागली न लागली एवढ्यांत जागृत होऊन, शौचविधि करून, मुखप्रक्षालन करून खिजमतगारास आज्ञा केली कीं नकीबांस बोलावणें करून हुकूम द्यावा कीं, लहान थोर सरदारांनीं तयार होऊन लढाईस चलावें. याप्रमाणें नकीबास ताकीद होतांक्षणींच ते संपूर्ण सैन्यांत फिरून, ताकीद करतां क्षणीं सर्व सरदार लहान थोर एकदील होऊन शिलेपोसें सरंजामानिशीं तयार जहाले.

तदनंतर विश्वासराव साहेब व भाऊसाहेब या उभयतांनीं तैलाभ्यंग करून मंगलस्नानें केलीं. देवतार्चनें संपादून, फलाहार अल्प करून, पिकले पानांचे विडे घेऊन, जामदारखान्यांत जाऊन, रणांगणींचीं पीत वस्त्रें घेतलीं. शिरपेंच व तुरे व चौकडे व बाजूबंद, व मोत्यांच्या कंठ्या व शस्त्रास्त्रें ठायीं ठायीं बांधून तरकसकमाना हातीं घेऊन सज्ज झाले. नंतर निशाण-बारदारांनीं निशाणें घेऊन नगारा नौबती करून एकदांच गर्जना केली. तेव्हां भूमंडळें नादें करून तुंबळ जहालें. तेणें करून रणरंगधीरांस विरश्रीचीं स्फुरणें आलीं. प्रातःकाळ होतांच दुसरा नगारा जहाला. तेव्हां तमाम सरदार तयार होऊन येऊन सदाशिवपंतांस मुजरे करून आपापले घोड्यावर स्वार जहाले. भाऊ साहेबांनीं

५. मागें बाळाजी विश्वनाथानें सर देशमुखीच्या सनदा दिल्लीहून नेल्या होत्या–हा त्याचा पणतु रूमशाम येथून तशा सनदा आणूं म्हणून उमेद धरतो!

६. ढाला=निशाणें.

७. भाऊंचें विश्वासरायावर व माधवरावावर व त्या दोघांचें भाऊंवर असें परस्पर प्रेम किती होतें तें वरील मजकूर वाचून ध्यानांत येईल.

८. 'उपवास' पाठ.

९. नकीब=पुकार करणारा, भालदार.

१०. शिलेपोस=कवचकुंडलादि.

११. जामदारखाना= वसनागार.

१२. तरकश=बाणांचा भाता. कमान=शिंग लववून केलेलें धनुष्य.

१३. निशानबारदार, निशानदार=पताकाधर, निशाण वागविणारा.

१४. 'नभमंडळ' प्र० ४.

मल्हारजी होळकर व जनकोजी शिंदे व दमाजी गाइकवाड यांस सन्निध बोलावून आणून सांगितलें कीं, " आजचा निदान समय, शंभर वर्षे पूर्ण भरलीं आणि आज सतीचें वाण घेतलें. त्यापरती दुसरी गोष्ट आणुमात्र चित्तांत आणूं नये. तुम्ही पुरातन कैलासवासी रावसाहेब व आपासाहेब यांचे वेळचे यरुत्यारी आहां. आजपर्यंत अन्न भक्षिलें त्याचें आज सार्थक करून दाखवावें. स्वर्गीं रावसाहेब व आपासाहेब भले म्हणतील, तें कर्म करावें ! रायांनीं दौलत सुद्धां आम्हांस तुमच्या हवालीं करून कैलासभुवनास गेले. त्या गोष्टीची शरम तुम्हांस असावी. यश किंवा अपयश हें तुमचें तुम्हीं सांभाळावें!" म्हणून भाऊ साहेबांनीं सर्वांस पदर पसरून सांगितलें. तेव्हां होळकरादिक सरदार यांणीं उत्तर दिलें कीं, " आम्ही जीवित्वाची तमा धरीत नाहीं ! महाराजांचें पुण्य आमचे मस्तकीं असतां इराणीची बिशाद काय ? मारून गर्दीस मिळवून देऊं. आपण कांहीं चिंता न करावी. " याप्रमाणें बोलून मुजरा करून आपआपल्या मिसलेस उभे राहिले.

पेशजी इराणीनें शुभ्र कुंजर भाऊसाहेबांस दिला होता तो ऐरावततुल्य भयंकर, दुसरा शामसुंदर गज कज्जलप्राय शूरत्वांत आगळा रणरंगधीर, तिसरा गजानन बक्ष. हे तीन हत्ती शृंगारून आणून उभे केले. पंचरंगें करून चित्रविचित्र शुंडादंड मस्तकावर रेखिले व बादली पाखरा गजपृष्ठीवर घालून सुवर्ण मंडित पिपळवनें मुक्तलडाच्या झालरी व गळ्यांत रुप्याच्या घंटा, व रुप्याच्या वांकी, तोडर पायीं, रुप्या सोन्याच्या अंबाऱ्या हत्तींवर ठेवून चौफेर मोत्यांचे घोंस लाविले. ते मदोन्मत्त वारण विलोकितां केवळ सुरेश्वराचे ऐरावत भासले. रणरंगधीर गजावर सदाशिवपंत भाऊ आरूढ जहाले. व गजानन बक्षावर खासे विश्वासराव साहेब स्वार जहाले. व शुभ्रवर्ण गजबक्षावर जरी पटका ठेविला. तिसरी नौबत करवून, भीमों ऐशी गर्जना करून

---

१५. सतीचें वाण घेणें=सती मरावयास सिद्ध होते त्या प्रमाणें मरावयास सिद्ध होणें. मारूं किंवा मरूं अशा दृढनिश्चयानें लढाईस तयार होणें.

१६. राव साहेब व आपा साहेब=बाजीराव बल्लाळ व चिमाजी बल्लाळ.

१७. यरुत्यारी= निर्वाहक, निर्वाहकरणारे; मुखत्यार, प्रमुख सरदार.

१८. रायांनीं= बाजीराव व चिमाजीआपा यांणीं.

१९. 'येऊन' प्र० १ व २.

२०. मिसलेस=नेमलेलेजागीं.

२१. 'जरीबादली' प्र० ३. बादली=भरजरी.

२२. 'मुक्तलगाच्या' पा० भे०.

२३. प्र० १ व २ मध्यें एकदां 'रणरंगधीर' व एकदां 'रणधीर' असें नांव आढळतें.

२४—२४. हे शब्द प्र० १।२ मध्यें नाहींत.

खंदक पार जहाले. पुढें बाणांच्या खोंचेचें[२५] तफावर्तानें उभे राहिले; व संपूर्ण सरदार लहान थोर भाऊ साहबांजवळ येऊन फिरून मुजरे केले. सर्वांचे[२६] मुजरे घेऊन सेनासमेत उभे रा[२६]हिले. भाऊसाहबांनीं सारी सेना गोचर केली. तों फौज असंख्यात, नजर पुरेनाशी झाली. तेव्हां भाऊसाहेबांनीं मल्हारजी होळकर यांस विचारलें कीं, "कोणते तऱ्हेनें सैन्याचा विभू रचावा? शत्रू आपले कबजांत कोणते तऱ्हेनें आणावा ! एकदांच चालून घ्यावें किंवा तीन टोळ्या कराव्या ? कोणते टोळीस कोण नेमावा ? याचा विचार सांगावा." त्याजवर मल्हारजी होळकर यांनीं विनंती केली कीं, "फौजेच्या तीन टोळ्या कराव्या." डावे बाजूस विश्वासराव साहेब यांजकडे लोकांच्या नेमणुका जहाल्या. तपशील मोठे मोठे नामांकित सरदार असामी.

| | | |
|---|---|---|
| १. यशवंतराव पवार. | १. व्यंकोजी[३०] मोहिते. | १. रहिमान[३३] खां. |
| १. संताजी आटोळे. | १. धीराजी[३१] पवार. | १. कमाल खां. |
| १. जंगी समशेर[२७]. | १. भगवंतराव रणदिवे. | १. चंदू खां. |
| १. जिवाजीपंत. | १. धारराव पाटणकर. | १. पायदळ. |
| १. गोविंदराव निंबाळकर. | १. यमाजी बांडे. | १. फुट पथके. |
| १. गोविंदराव व्यंकटेश. | १. मानसिंगराव मुळे. | १. सफजंग जमादार. |
| १. दत्ताजी वाघ. | १. मायाजी बाडगेकर[३२]. | १. मीरबेग[३४]. |
| १. संक्राजी वाघ. | १ चिमणाजी जनार्दन. | १. हसलखान. |
| १. बुंधकर[२८] मंडळी. | १. सदाशिव त्रिंब्णु*. | १. बडेखां. |
| १. फिरंगोजी पवार. | १. चिमाजी मोहिते. | १. सुजात खां. |
| १. चिमणाजी माधवराव. | १. हसनखां. | ३४ असामी. |
| १. सोनजी भापकर. | १. फरदुल्ला खां. | |

सदर्हूप्रमाणें जहाल्या. यशवंतराव पवार पंचवीस[३५] हजार फौजेनिशीं केवळ महाभारतींचा वीर, नामांकित, जगत्प्रसिद्ध, ज्याच्या पराक्रमाचा लौकिक वडिले

२५. खोंच=मारा. बाण सोडिला असतां जेथें खालीं पडून जमिनींत खोंचतो तितक्या अंतरावर म्हणजे बाणाच्या टप्प्यांत, माऱ्यांत. प्रत ३ 'खाचमाराच्या' प्र० ४ 'खासमाराच्या'.

२६—२६. हे शब्द प्र० १।२ मध्यें नाहींत.

२७. 'जंगीबहादर' प्र० ४.

२८. 'बुधेलकर' प्र० ४.

२९. 'जाधवराव' प्र० ३.

३०. 'कान्होजी' प्र० ३ 'वन्होजो' प्र० २. प्र० ४ हें नांव मुळींच देत नाहीं.

३१. 'हिराजी' पाठभेद.

३२. 'मोत्याजी बडगीर, प्र० ३

* 'सदाशिव विष्णु वगैरे फुट पतके' प्र० ३.

३३. 'रहिमखां' पा० भे०

३४. 'मियाबेग' पा० भे०

३५. 'तीस' प्र० ३.

वाडिलीं सरकार चाकरी करून संपादितच आले. याप्रमाणें नामी नामी सरदार व धारकरी मिळोन एकंदर राऊत चौळीस[३६] हजार. शिवाय पायदळ, इब्राम खां गाडदी यांजकडील प्रमुख सफेजंग जमादार व हसनखां[३७] व फरदुल्लाखां व चंदूखां वगैरे गार्दी लोक पंचवीस[३८] हजार खांसागज व फुटपतकें पांच हजार एकूण विश्वासराव साहेबांचे टोळीस फौज सत्तर हजार[३९]. दुसरी टोळी[४०] सदाशिवपंत भाऊ खांसे अंबारींत बसून[४१] [ अंबारीच्या ] खांबांस नवरत्नांचे फर्शी[४२] बांधिले. कारण कीं, संपूर्ण वसुंधरेचें राज्य करीन किंवा इंद्रपदीचें घेईन ! अंबारींत[४३] बसतांच शरीर लाल झालें व नेत्रही आरक्त झाले. त्या समयीं भाऊ कसा भासला कीं, केवळ कल्पांतीचा आदित्य. याप्रमाणें भयानक दिसूं लागला. त्या वेळेस कोणाच्यानें पहावेनासें झालें. हा केवळ कलियुगीं कर्ण जन्मला यांत संदेह नाहीं. सभोंतीं फौज ५८ हजारांचा गलोल घेऊन मध्यभागीं इराणीसमूर परम आवेशें उभे राहिले[४३]. तिसरी टोळी तपशीलवार असामी बितपशील:--

| | |
|---|---|
| १. जनकोजी शिंदे. | १. समशेर बहादूर. |
| १. दमाजी गाइकवाड. | १. किरकोळ पतके. |
| २ | २ |

४

सदर्हूप्रमाणें जनकोजी शिंदे व दमाजी गाइकवाड व समशेर बहादूर वगैरे किरकोळ पतके मिळोन साठ सत्तर हजार घोडेस्वार, याप्रमाणें जमाव करून उभे[४४] राहिले. याप्रमाणें तीन टोळ्या करून निशाणें सोडून, जुमस न खातां, उभे राहिले. श्रीमंत भाऊसाहेबांची स्त्री सौभाग्यवती पार्वतीबाई साहेब व इतर सरदारांचे कबिले[४५] व बुणगे बाजार यांचे संरक्षणास मल्हारराव होळकर दहा हजार फौजेनिशीं मागे ठेविले.

---

३६. 'सत्तर' प्र० ३ व ४.

३७. ह्या शब्दा पुढें प्र० ३ मध्यें 'याचा भाचा' असे शब्द आहेत.

३८. 'पंचावन' प्र० ३ व ४.

३९. ह्या वाक्याबद्दल प्रत ३ मध्यें असें आहे, 'एकून फौज घेऊन विश्वासराव खांसा गजपृष्ठावर आरूढ होऊन वामकरीं चापबाण आकर्षण करून वीरश्रीतवकें उभे राहिले.'

४०. यापुढें 'सव्यभागीं' असे शब्द प्र० ३ मध्यें आहेत.

४१. 'बसून हातीं शरचाप घेऊन ठाण मांडिलें.' प्र० ३.

४२. फर्शी=फरश=परशु. सदाशिवराव हे परशुरामाचा अवतार असें म्हणत असत. परशुरामाचें मुख्य शस्त्र 'परशु' हें होय.

४३–४३. ह्याबद्दल प्र० १ व दोन मध्यें "याप्रमाणें दीड लक्ष फौजेनिशीं उभे राहिले." येवढेंच वाक्य आहे.

४४. ह्या वाक्यापुढें प्र० ३ मध्यें असें वाक्य आहे "या प्रमाणें तीन टोळ्या करून, निशाणें सोडून, जुम्मस न खातां उभे राहिले."

४५. कबिले=स्त्रिया.

हें पाहून इराणी दुराणी व दिल्लीपद बादशहाकडील, व सुजातदौले व व मनसूर अल्ली यांणीं आपले गांठ सोडून, फौजेचा पुस्तपन्हा[४६] राखून, त्यांनीं ही तीन ढोळ्या करून, लढाई प्रसंगास खांसा इराणी मध्यभागीं सत्तर हजार फौजेनिशीं व डावेकडे मनसूर अल्ली चाळीस हजार फौजेनिशीं व उजवेकडे सुजातदौले व हस्तनापूरवासी इसाफतखां[४७], येणेंप्रमाणें दोडी[४८] लक्ष फौजेनिशीं उभे राहिले. खांसा अबदल्ली पन्नास हजार फौजेनिशीं मागें गोठांत राहिला. दोघे पुत्र मात्र पुढें आले होते त्यांचीं नांवें, एकाचें नांव तेजूरशहा व दुसऱ्याचें नांव नजीमखां. यांजवळ रोहिले यांची खासी खासी जमेत[४९] एक दिलाची होती. त्यांतून तेजूरशहा यांनीं पन्नास हजार फौजेनिशीं दिन्! दिन्! म्हणून नीट चालून घेतलें.

तेव्हां युद्धास तोंड[५०] लागलें, दारूण संग्राम झाला. हवद्यांस हवदे, राउतांस राऊत, एक मेळ जहाला. व सुतरनाले[५१] बाणाच्या[५२] कैंच्या व करोलांच्या[५३] गोळ्या व गरनाला व तोफांचा मार एकदांच जहाला. एकच रणधुमाळी दोन्ही सैन्यांत माजली. धुरेंकरून दिनमणीचा अस्त झाला अस्त भास पडला. घे घे हीच गर्जना उठली. उमास घ्यावयास अवकाश पडेना. पुढचा पाय पुढें. कोणास कोणी हरेना. एका परीस एक आगळे. इराणीची जात अरबुज[५४], आपपर म्हणावयाची नाहीं. महाबली, महा पराक्रमी, मोगल, पठाण व रोहिले, रांगडे व रजपूत व पंजाबी, बिलंदे, माळवी व काठेवाडी वगैरे नाना जातीचे त्यांनीं संग्रामाची सीमा केली. बहुत मराठे दळ खपलें. रक्तोदकाचे पाट रणभूमीस वाहूं लागले. बिभित्स शरीरें[५५] दिसों लागलीं. देहाभिमान कोणांत उरला नाहीं. चौफेर लढाईची बेहद्द होऊन गेली. थोर थोर अमिरांचे हौदे खालीं जहाले[५६]. इराणी हांवभरी होऊन[५७] फिरून नीट फौजेंत चालून घेतलें. तेव्हां मराठी फौज कच खाऊन माघारी सरली.

---

४६. पुस्तपन्हा=मदत, पाठबळ.

४७. ह्या नांवाबद्दल 'व सादतखां' असें प्र० ३ मध्यें आहे.

४८. 'दोन अडीच' 'अडीच' प्र० ३ व २.

४९ 'जमेत ५० हजारांची' प्र० ३.

५० तोंड लागलें=प्रारंभ झाला.

५१. सुतर-नाला=उंटावरील भांडीं ( लहान तोफा. )

५२. हे बाण लोखंडी नळ्यांचे असून त्यांत दारू भरलेली असे. हे शत्रूची फळी फोडण्यास व दाणादाण करण्यास उपयोगी पडत. कैंची=२४ बाणांचा जुडगा, दस्ता.

५३. करोळ=स्वारांच्या बंदुका.

५४. अरबुज=रानटी, क्रूर.

५५. याजपुढें 'रक्तोदकें भयानक' असे शब्द प्र० ३ मध्यें आहेत.

५६. हौदा खालीं होणें=हौदा रिकामा पडणें.

५७. हांवभरी होऊन=ज्यास्त आशा, उमेद येऊन.

मि.

तें[५८] पहातांच भाऊसाहेबांनीं फौजे सुद्धां आपला अंबारीचा हत्ती फौजेंत लोटला. तेव्हां डावी टोळी विश्वासराव साहेबांची होती, ती बेजरब[५९] उठली. उजवेकडून जनकोजी शिंदे कमरग्यांत[६०] शिरून मोठी मारामार जहाली. शरसंधान अगदींच राहिलें. निमचे व समसेरा चालूं लागल्या. तीन चार तास पर्यंत एकच घाई शस्त्रसंधानाची झाली. मुर्द्यावर मुर्दे पडूं लागले. वीरांच्या नजरा फिरोन गेल्या. आपपर कोणी ओळखेनासे जहाले. वीर रणांमध्यें माजले. रणमद चढला. खांशा खांशांचे हौदे एकास एक लागून जोरावारीनें लढों लागले. केवळ दशाग्नी शताग्नीशीं मारूं[६१] लागले. ते समयीं सदाशिवपंत [यांणीं]अंबारींतून उतरून, दोहों हातीं पट्टे घेऊन, नीट फौजेंत चालून घेतलें. तेव्हां नामी नामी सरदार व धारकरी नांवाबिनांवाचे यांणीं जीवित्वाची तमा न धरितां बेलाशक हैदोसें[६२]च केलें[६२]. कोणास क्षतें वर्मीं लागलीं, ते विष्णु[६३]लोकास गेले. व कोणीं रणांगणीं मुर्च्छित पडले. व कोणांचीं शिरें तुटोन धडांवेगळीं झालीं. व कोणाचीं उदरें फुटोन अंतरमाळा[६४] लोंबूं लागल्या. परंतु अणुमात्र कोणीं लढाई विषयीं कसर केली नाहीं. एकच गर्दी होऊन गेली. खांसे विश्वासराव साहेब अगदींच गर्दींत गर्द होऊन गेले. तेव्हां सदाशिवपंत पाय उतारा होते ते घोड्यावर स्वार होऊन सैन्यांत मिसळले. मोठी तरवार करून विश्वासराव साहेब अंबारी सुद्धां संभाळून माघारे आपले नमातींत पौंठ[६५]विले. परंतु कायम आहेत किंवा वैकुंठवासी जहाले याचें वर्तमान पुरतेपणें लागलें नाहीं. आपण तसेच पुढें चालून गेले. तेथें नामी नामी लोक दोन हजार ठार पडले. इराणीनें नामोहरम[६६] होऊन पाठ दिली.

त्या युद्धांत इकडील व तिकडील एकंदर चाळीस हजार लोक कामास[६७] आले. खेरीज केवळ जखमी लोक दहा हजार. याप्रमाणें युद्ध जहालें. या मागें या

---

५८–५८. याजबद्दल प्र० १।२ मध्यें "ते समयीं इराणीच्या फौजेंत मोठी कहवी" इतकेंच आहे.

५९. बेजरब=बेलाशक, निर्भयपणें मागें पुढें न पहातां.

६०. कमरगा=मध्य प्रदेश, बाजू.

६१. प्र० ४ शिवाय सर्व प्रतींत 'मरूं लागले' असें आहे. 'दशाग्नि शताग्नीशीं' याचा अर्थ बरोबर समजत नाहीं. सर्व प्रतीचा पाठ एक सारखाच आहे. 'दशघ्नी शतघ्नी अशा शस्त्रांनीं मारूं लागले' किंवा 'दहा दहा गोळ्या ( अग्नि ) शंमर शंमर गोळ्या लागून मरूं लागले' असा कदाचित अर्थ संभवेल.

६२–६२. याबद्दल 'चालून घेतले. रक्तांबर लोक झाले' असें प्रत ३ मध्यें आहे.

६३. 'यमसदनास' प्र० ३.

६४. अंतरमाळा=अंत्रमाला=आंतड्यांचीं वेटाळीं.

६५. 'आणिले' प्र० ३.

६६. 'मोहरम' प्रत १ 'नाबूद' प्रत ४

६७. कामास आले=पडले.

कलियुगीं असा योद्धा कोणी जहाला नाहीं. पुढें ही होणें जरूर. भारती युद्धा समान सदाशिवपंतांनीं युद्ध केलें. या कलयुगीं मानव कर्तीत ब्राह्मण कुळांत जन्म घेऊन पराक्रम थोर केला. धन्य त्यांची जननी कीं असा पुत्र प्रसवली ! येणें करून सप्त पुरुष उद्धरून विष्णुलोकास गेले. धन्य त्या पुरुषाचा पिता ! त्यास साम्यता दशरथाची, किंवा पंडूची ! चिमाजी आप्पाची धन्य कीं हा पुत्र रामाप्रमाणें निर्माण जहालें. हें युद्ध पाहून स्वर्गी इंद्र व देवगण व गंधर्व स्तुति करुं लागले कीं मानवी होऊन, जातीचा विप्र असतां, प्रताप कर्णाप्रमाणे केला ! ! केवळ राम रावण यांच्या युद्धा समान युद्ध झालें. इराणीकडील लोक तीस सहस्त्र कामास आले व आठ हजार जखमी जहाले. शिवाय घोडीं वीस हजार, उंटे सातशें व हत्ती दोनशें, येणें प्रमाणें अमित्राकडील तळावर राहिले. भाऊसाहेबांकडील नामी सरदार व धारकरी, एकाण्डे हुजरातीचे लोक वीस हजार ठार पडले. शिवाय उंटें पांचशें व घोडे पंधरा हजार व हत्ती नग सव्वाशें. ऐसा संग्राम जहाला. मुख्य अबदल्लीचा पुत्र तेनूरशहा बहादर व नजीमखां वगैरे मातबर पठाण व रोहिले हक्क होऊन गेले. खांसे सुजातदौले यास चार जखमा जहाल्या. इराणीचे फौजेनें शिकस्त खाऊन माघारी फिरली. अवसान अगदीं खत्ता जालें. भाऊंनीं सेना सहित पिच्छा पुरविला आणि इराणीच्या गोटांत फौज नेऊन घातली. एकीकडे पठाणांची टोळी होती ती नेस्त §नाबूद केली. सदाशिवराव भाऊ अभिनव यश पावले. आनंदसागरास पारावार नाहीं. शत्रु पराभवातें पावून, भाऊसाहेब व विश्वासराव साहेब उभयतां आपआपल्या अंबारींत बसून, महागर्जना करून रणतुरें व नौबती आणखी जय वाद्यें वाजवीत आपले गोटांत चालिले. एकच सिंहनाद झाला. +त्यांची फौज शिकस्त खाऊन मागे गेली. त्यासंधींत मागें अबदअल्ली पन्नास हजार फौजेनिशीं आपले गोटांत तयारच होता, त्याचे पुत्र उभयतां लढाईत हक्क जहाले, त्यांचें वर्तमान

---

६८. जरूर=कठीण, अशक्य.

६९. जेथें जेथें 'भारती. भारत' असें पाहिजे तेथें तेथें अनेकदा 'मारथी मारथ' असें मुळांत लिहिलेलें आहे. प्र० १–२ मध्यें 'भारती समान' इतकेंच आहे.

७०. 'केला' प्रत ३.

७१. 'एकुण लढाया चार' असें या वाक्यापुढें प्रत १ व २ मध्यें आहे.

७२. हक्क होणें=पतन पावणें.

७३. शिकस्त खाणें=पराजय पावणें.

७४–७४. हीं वाक्यें प्र० १।२ मध्यें नाहींत.

* खत्ता=नष्ट.

§ नेस्तनाबूद=नाहींशी.

७५–७५. हें वाक्य प्रत १।२ मध्यें नाहीं.

+ चवथे प्रतीस येथपासून तों ती उपलब्ध आहे तेथपर्यंत अगदीं भिन्न मजकूर आहे. हिचा व दुसऱ्या तीन प्रतींचा येथपासून मुळींच मेळ पडेना, सबब तो मजकूर स्वतंत्र पुढें देऊं.

श्रवण करून वाईटपणाचें ऐकतांच अबदल्ली यानें फौजेसहवर्तमान या अल्ला! या खुदा! या रहिमान! याप्रमाणें देवाचा धांवा करून, जीवित्वाचा संकल्प सोडून, एकदांच वाद्यें वाजवून फिरून सदाशिवपंतावर चाल केली. तेव्हां भाऊसाहेब यश संपादून आपले गोटांत जात होते. इतक्यांत शत्रु पाठीवर आला, हें वर्तमान कळतांच महातास सांगून खांशाचे हत्ती माघारे फिरविले. ते संपूर्ण फौजेनें पाहून सर्व लढाईच्या प्रसंगीं नीट चालिले. लढाई सुरू होतांच विश्वासराव साहेब अंबारींतून तिरंदाजी करीत होते, एवढ्यांत कोणी दुष्टानें बंदुकीची जोडगोळी घातली. ती हृदया पार होतांच विश्वासराव साहेब लागलेच वैकुंठवासी जहाले. तेव्हां त्या महातानें व जो खवासखान्यांत चौरीबारदार होता त्यानें कमरेचा दुपेटा काढून, विश्वासराव साहेबांस अंबारीचे खांबाशीं दृढ बांधून बसलेचे बसले तीर कमाणी सुद्धां तसेच ठेविले. पुढें लढाई होतच होती. या आकांताचें वर्तमान उजवे बाजूस भाऊसाहेब होते त्यांस विदित जहालें.

नंतर भाऊसाहेबांनीं आपला अंबारीचा हत्ती खालीं बसवून, विश्वासराव साहेब यांचे हत्तीजवळ जाऊन, तो हत्ती बसवून, रायाचें शरीर छिन्नभिन्न जहालें होतें तें दृष्टीनें पाहून परम दुःख जहालें. तें पत्रीं लिहिणाराची कल्पना कुंठित जहाली. श्रीराम अयोध्यापूर सोडून वनवासास जावयास सिद्ध जहाले, तें वर्तमान ऐकतांच दशरथानें कैकेयीच्या मंदिरांतच अंतर्धान केलें, तसेंच भाऊ साहेबांस जहालें. तेव्हां मल्हारजी होळकर यांस आज्ञा जहाली कीं, "तुम्ही पुण्यास जावें. बराबर आमचें कुटुंब व इतरांचे कबिले घेऊन जाऊन, श्रीमंत नानासाहेबांस व श्रीमंत सौभाग्यवती गोपिकाबाई साहेब यांस माझे साष्टांग नमस्कार सांगून विज्ञापना माझे तर्फेनें करावी. तुमचे चिरंजीव विश्वासराव साहेब व भाऊ साहेब तीन लक्ष सेनेसहित इंद्रलोकीं सुखरूप आहेत, कांहीं चिंता न करावी. उभयतां वडिलांनीं आजपासून लोभ चिरंजीव माधवरावसाहेबावर करीत जावा. पुढें कांहीं दिवसांनीं त्यांचे हातून संपूर्ण शत्रु लयास जाणार. मी परशुराम अवतार आणि चिरंजीव माधवराव साहेब केवळ अर्जुनाचा अवतार. आमचा संकल्प यांचे पराक्रमानें परिपूर्ण होणार. याप्रमाणें सांगितलेलें वर्तमान नानासाहेबांस व सौभाग्यवती वहिनीबाईस श्रुत करावें.

---

७६. जीवित्वाचा संकल्प सोडणें=जीव देण्यास तयार होणें—जीवावर उदार होणें.

७७. 'प्रसंगें' प्रत ३.

७८. खवासखाना=अंबारीच्या पाठीमागें खिजमतगाराची उभी राहण्याची जागा.

७९. चौरी-बारदार=चामर-धर.

८०. प्र० १ व २ मध्यें 'जाऊन' हा शब्द नाहीं.

८१. 'कलम' प्र० ३. कलम=लेखणी.

८२. कबिले=बायका, कुटुंबें.

८३–८३. हे शब्द प्र० १ व २ मध्यें नाहींत.

कदाचित् शत्रूंनीं तुमचा पिच्छा पुरविला असतां आमच्या कुटुंबाचा शिरच्छेद तुम्हीं आपले हातीं करावा, परंतु शत्रूंचे हातीं जीवंत लागूं देऊं नये." तसेंच जनकोजी शिंदे यांस सदर्हू अन्वयें निरोपण जहालें. शिंदे मजकूर यांणीं उत्तर केलें कीं, "मी पुण्यास माघारा जावयाचा नाहीं. खावंद जर माघारे पुण्यास येतील तर मी जाईन. नाहीं तर जेथें खावंदाचा जोडा पडेल तेथें माझें शिरकमल पडेल! यांत तिलमात्र अंतर नाहीं." तें ऐकून समागमें स्वारी बरोबर गंगोदकाच्या कुप्या चालत होत्या त्या सदाशिवपंत भाऊंनीं आणवून, खालीं गाशा घालून शेलापागोटें, जामानिमा, ढालतरवार, सुद्धां सचैल स्नान करून, एके कुपीचें उदक प्राशन केलें आणि उत्तर केलें कीं, "आमचें पारणें जहालें!" मग मल्हारराव होळकर यांस रामराम करून, "आतां लोभ असो द्यावा," असें बोलोन हयपान घोडा अर्बी होता. तो आणवून, वर स्वार जहाले. एवढ्यांत होळकर वगैरे यांणीं विनंति केली कीं, "एवढे हट्टास पडावयाचें कारण नाहीं. आपण उज्जनीस साल मजकुरीं छावण्या कराव्या. पेस्तर सालीं शत्रु आपण पहातच आहों. पुण्यास जावयाची खावंदास शरम वाटेल तर आलीकडे गंगा[८४] अथवा नर्मदा अथवा क्षिप्रा एवढ्यास्थळीं मुक्काम वर्ष सहा महिने करून, सर्व सरदार, घोडे, हत्ती व उंट व तट्टें, पायदळ, व तोफखाना यांचे बैल व अवांतर सेना खाऊन पिऊन हुशार होऊन पेस्तर सालीं रूमशामची खबर घेऊं! हिंदूचे मुसलमान होऊं परंतु छत्रपतींचें नांव राखूं यांत अंतर नाहीं!! आणि आपण कांहीं पदरचे सरदार यांचें ऐकत जावें. कारण पेशजी साष्टी, वसई कैलासवासी चिमाजी आपा यांणीं फत्ते केली. आणि प्रतिज्ञा[८५] मोठीच केली होती परंतु चौघां सरदारांचे मतें कोणतीही एखादी गोष्ट शेवटास नेती[८६]. तसेच आपण वर्तावे." तेव्हां भाऊसाहेबांनीं उत्तर केलें कीं, "चिरंजीव विश्वासराव साहेब गोळी लागून कामास[८७] आले. आतां आपण मोठा पराक्रम जरी करून पुण्यास गेलों तरी सौभाग्यवती गोपिकाबाई साहेब माझें मुखावलोकन करणार नाहींत. कारण त्यांचे केवळ जिवाचे जीव विश्वासराव साहेब ते लढाईंत पडले असतां त्या वडिलांचे भेटीस आपण जावें हें अयोग्य."

एवढ्या संधींत मलका जमानी[८८] बिबीसाहेब, दिल्लीश्वराची बादशहा जादी, हिणें जी फौज रूमशामचे बादशाहाकडून कुमकेस इराणी व दुराणी, गिलचे नादिरशाह व तंबूरशाह वगैरे आली होती त्यांस पदर पसरला कीं, "तुम्हीं

---

८४. गंगा=गोदावरी.

८५. प्रतिज्ञा—पेशव्यांची बखर पृ० ३२ पहा.

८६. 'नेली' प्र० १ व २.

८७. कामास आले=ठार झाले.

८८. भाऊ साहेबांची बखर पृ० २२ व २३ पहा.

जर लढाईस कमकसर केली तर दिल्लीचे बादशाह फकीर होऊन देशांतरास जातात. हें समजून एक वेळ आणखी लढाई रणखंदल करावी. त्यांत खुदानें यश दिल्यास पुनः दिल्लीस जाऊं. नाहीं तरि दिल्ली सोडून परागंदा होऊं. तुमचे लष्करासन्निध उतरलों आहों. मुसलमानी बादशाहीची शरम ठेऊन बेजरब[८९] लढाईस भिडावें. बैरग्यांची फौज दरवर्षी येऊन बादशहास इजा देऊन, घासदाण्याचे ऐवजीं खंडण्या घेतात, आणि रात्रंदिवस बादशहा दिलगीर होतात, हें दुःख सोसवत नाहीं. आपण बादशाहत करूं अथवा बारगे करतील हाच संकल्प !" तेव्हां सरदारांनीं तसलिमात[९१] करून, बिबीसाहेबांचा हुकूम घेऊन, एकदांच घोड्यांच्या अनीनांना[९२] उठवून मोहळांच्या माशा उठतात त्याप्रमाणें सर्वत्रांनीं उडी घातली. तोफा व बंदुका आणि बाणांच्या कैच्या व गरनाला आदि करून अगदींच राहिल्या. तरवार चालती जहाली.

तेव्हां राव भाऊंनीं त्या रोहिल्या प्रमाणेंच उडी घातली. पहिल्या लढाईच्या वेळेस सव्वा चार लक्ष फौज गणतीस लागली होती. त्या आलीकडेस सर्व सैन्य लढायांत खपून तीस सहस्र घोडा स्वार शिलक राहिला. त्या सुद्धां भाऊसाहेबांनीं उडी घातली. तेव्हां [भाऊ] केवळ कल्पांतीचा आदित्य भासला. ग्रीष्म ऋतूच्या दिवसांत मेघाचे ढग उठतात आणि विद्युल्लता चमकून लागलीच नाहींशी होते, त्याप्रमाणें भाऊसाहेबांनीं संग्रमांत उडी घातली ते समयीं सर्वांस दिसले. तिकडील खासा अबदल्ली व मनसूरअल्ली व सुजातदौले, इराणी कडील नादिरशाह, तंबूरशाह वगैरे उरल्या फौजे सहित त्यांणींही उडी घातली. ते समयीं श्रीहरी त्या अमित्राकडील फौजेस सन्मुख जाहला. श्रीमंत[९३] पेशवे बहादूर यांस विन्मुख झाला[९३]. याजमुळें सर्व नाश जाहला.

हत्ती घोड्यांनीं व उंट तट्टांनीं संपूर्ण खंदक भरला. खंदक भरल्यावर जे लोक भिकारी होऊन अन्न अन्न करीत दुसरीं[९४] वेशधेरून[९४] पुण्यास आले ते आले. कितीकांचे तोतये जहाले. हजारों हजार त्या कुरुक्षेत्रीं रणमंचकीं निजलेच राहिले. पुढें असा संग्राम होणें कठीण आणि अशा पुण्यभूमीस मरणही येणें कठीण. त्यांत धारातीर्थ भाऊसाहेब केवळ परशुराम अवतार, लढाईची या मृत्युलोकीं कीर्ति करून, मोठमोठ्या शत्रूंचीं[९५] पारिपत्यें करूनें[९५], मरण काळपर्यंत नानासाहेबांची

---

८९. बेजरब=निर्भयपणें, धास्ती न खातां.

९०. बारगे=मराठे मागें पृ० १७ टीप १८ पहा.

९१. तसलिमात=प्रणाम, सलाम. प्र० ३ मध्यें या शब्दाबद्दल "मान तुकावून" असें आहे.

९२. अनीन=कण्ठरज्जु, लगाम.

९३-९३. हें वाक्य प्र० १ व २ मध्यें नाहीं.

९४-९४. हे शब्द प्र० १ व २ मध्यें नाहींत.

९५-९५. याबद्दल '•शत्रूंचे नक्षे उतरून' असें प्र० ३ मध्यें आहे.

आज्ञा न उल्लंघितां, दररिकिबीसें तरवार फत्ते करून, जन्मप्रभृति जय संपादून शके १६८२ विक्रमनामसंवत्सरीं मंगळवारीं पौष शुद्ध २ अवतार संपविला. ते दिवशीं मागील चारघटिका दिवसास सूर्य असतांच अंधःकार पडला. रण रात्रीस हा कालपर्यंत घुमत असतें.

तें तहकीक वर्तमान एक बारनिसैनीं डाके बरोबर पुण्यास नानासाहेबांस लिहून पाठविलें. वर्तमान नानासाहेबांनीं श्रवण करून भाऊसाहेबांची बहुत खंती करूं लागले. रात्रंदिवस जेवितां व स्नान संध्येत व कारभाराचे कचेरींत, व झोंपेंत भाऊ! भाऊ! म्हणून डचकून उठूं लागले. केवळ भाऊसाहेबांचें वेड लागलें. "हाय! हाय! भाऊ! माझे दृष्टीस केव्हां पडशील! केव्हां भेटशील? माझा पुत्र विश्वासराव गेला. त्याचें मला फारसें स्मरणही होत नाहीं. परंतु भाऊसाहेबांनीं मला मागें टाकून आपण स्वर्गवास केला. माझे अंधळ्याची काठी चोरून नेली! माझे धनाचीं चरू कोणीं चोरून नेला तो कळेना!! आतां प्रपंचांत राहून कांहीं एक नफा नाहीं. आतां देहत्याग करावा अथवा संन्यास घ्यावा अथवा वैराग्य घेऊन जिकडे भाऊसाहेब गेले तिकडे जावें. हा हेतु यापरता दुसरा विचार नाहीं. असा शोक जहाला."

तदनंतर सर्व कारभारी यांणीं परोपरी विज्ञापना केली. तथापि नानासाहेब शोकार्णवीं पडोन भ्रांत जहाले. अन्न, पाणी, तांबुल, विलास, नृत्य, कारभार व कोणत्याही गुणें करून व कोणत्याही विषयें करून मर्जी शांत होईना. सबब पुणें मुक्कामींहून दुसरी फौज पुणें संस्थानचीं होती ती सिद्ध करून, भाऊसाहेबांचें उसनें घ्यावें या कारणास्तव हिंदुस्थान प्रांतीं मोहिमेस चालले. कोण्या कारभाऱ्यांचें पुढें चालेना. रामचंद्रासाठीं भरतानें अयोध्यापूर सोडून नंदिग्रामीं राहून वैराग्यवत, उदास जहाले; तद्वत राव नानांनीं आरंभिलें. मजल दर मजल करीत चालले. खेचेवाडे पर्यंत गेले. तेव्हां कोणे एके दिवशीं रात्रौ भोजन करून मजलसीस बसले असतां रायास भाऊसाहेबांचें स्मरण जहालें. तेव्हां गहिंवर येऊन अश्रुपात करूं लागले. इतक्या समयांत कोणी कलावंतिणी नृत्य करावयास आल्या. त्यांनीं उत्तम प्रकारचें गायन करून रायाची मर्जी सुप्रसन्न केली. तेव्हां साहेबांनीं म्हटलें कीं, "जी इच्छा असेल ती आज मागावी, मी देईन."

९६. दररिकीबीस=क्षणोक्षणीं, पुनः पुनः

९७. "तो दिवस शके १६८२ पौष शुद्ध ८ बुधवासर होता." असें भाऊ साहेबांच्या बखरींत आहे. (पृ० ११९.)

९८. "बारसनिसानें व वकिलानें" प्रत ३.

९९. "माझे निधनाचे (निर्धनाचे!) धनाचा चरू०" प्र० ३.

१००–१००. '०मुक्कामीं दुसरी फौज होती ती' प्र० ३.

१. मजलस=सभा, कचेरी.

अशी आज्ञा जहाली तेव्हां त्या कलावंतिणीनें पुढें पदर पसरून अर्ज केला कीं, " आपण दक्षिणचे ब्राह्मण बादशाह, ज्या ठिकाणीं भाऊसाहेब गेले आणि गर्क जहाले तें ठिकाण आपण दृष्टीनें पाहूं नये. व खावंदानीं मोहिमेस स्वतां जाऊं नये. दुसरे सरदार पाठवून शत्रूंचीं पारिपत्यें करावीं. हेंच आम्हांस बक्षीस द्यावें. आणखी कोणे गोष्टीची इच्छा नाहीं. सर्व कांहीं खावंदाचे चरण-प्रतापें करून आम्हांस घरीं अनकूळ आहे." त्या समयीं पुरंदरे वगैरे ब्राह्मण मंडळीं कारभारी व मराठे व मुसलमान सरदार यांणीं रायास विनंती केली कीं, " महाराजांनीं इच्छा असेल तें मागावें, मी देतों, असें वचन दिलें; त्यापेक्षां हें बक्षीस त्या कलावंतिणीस देणें प्राप्त, अशा भागास गोष्ट आली. याजवर धनी समर्थ आहेत." याप्रमाणें सर्वांचीं भाषणें रायांनीं श्रवण करून माघारां ढाला फिरविल्या.

फिरून स्वारी पुण्यास येऊन विक्षिप्त भाऊसाहेबांचे वियोगें करूनच जहाले. काम कारभार कार्याकारण होऊं लागले. गादीवर बसणें त्याचाही त्याग केला. दिवसेंदिवस शरीर कृश झालें. इहिदे सितैनांत ज्येष्टमासीं नानासाहेबांनीं कैलास-वास केला.

भाऊसाहेब व जनकोजी शिंदे, यशवंतराव पवार व आपाजी जाधवराव व बापूजी बल्लाळ फडके वगैरे मंडळीचे ठिकाण लागलेंच नाहीं ! वि-श्वासराव साहेब यांचा हत्ती प्रेतासुद्धां शत्रूंनीं वळवून नेला. आणि विश्वासराव साहेब यांचें स्वरूप गिलचे अबदल्ली व मनसूर अल्ली आणि सुजातदौले व इराणीकडील सरदारांनीं पाहून बहुत श्रम पावले, आणि ह्मणूं लागले कीं, " असल्या मोहऱ्यास कोणीं गोळी घालून मारिला ! जिवंत अंबारीसुद्धां धरून आणावयाचा होता. तुम्ही मारिला हें ठीक केलें नाहीं " असें म्हणून सर्वांनीं धरणीवर शरीरें टाकून हाय हाय ! करूं लागले. कोणी आपल्या पदरानें अशु-द्ध पुसूं लागले. कोणीं मुखाशीं मुख लावूं लागले. तेव्हां शत्रूकडील सरदा-रांनीं तसलिमात केली कीं, " त्याजकडील लष्करांतून गोळी लागली आणि हक्क जहाले. याचा दोष आमचेकडे नाहीं." मग अबदल्ली वगैरे यांणीं कबर बांधावयास हुकूम दिला. तेव्हां अनुपगीर गोसावी, चेरणगीर गोसावी वगैरे

२. ढाला=निशाणें.
३. 'मसलत गादी०' प्र० ३. 'मसनद' याजबद्दल मसलत लिहिलसें वाटतें.
४. श्रम पावले=दुःखी जाहले.
५. 'अश्रु' प्रत १.
६. तसलिमात=प्रणामपूर्वक विनंति.
७. हक्क होणें=ठार होणें.
८. कबर बांधावयास=पुरावयास.
९. 'चरणगीर' हें नांव प्र० १ व २ मध्यें नाहीं. भाऊ साहेबांच्या बखरींत 'उमरावगीर' असें आहे. पृ० १२१ पहा.

रजपूत व रांगडे यांणीं अबदल्लीस अर्ज केला कीं, " आमचा हिंदूचा मुर्दा, त्यांत पेशवे बहादूर यांतील खांसा धनी, यांचें यडगें किंवा छत्री काय करणें ती आम्ही करूं. मुसलमानास एकंदर[१०] करूं देणार नाहीं. या विषयीं आम्ही सर्व हिंदूं[११] लढाईस मजबूत आहों, यांत अंतर नाहीं. " अशी प्रत्युत्तरें गोसावी यांचीं वगैरे अबदल्ली व दिल्लीपत बादशहा वगैरे यांनीं ऐकून प्रेत त्यांचे हवालीं केलें.

पुरुषांत देखणा विश्वासराव साहेब किंवा बायकांत देखणी मस्तानीबाई साहेब, समशेर बहादूर यांची मातोश्री, अशीं दोन माणसें दक्षिणेंत स्वरूपानें जहालीं. श्री० नानासाहेब अंशधारी[१२] पुरुष, त्यांत शाहू महाराज छत्रपती यांचा वरद हस्त मस्तकीं, तेणेंकरून सर्व पेशव्यांचे वंशांतील पुरुष जय संपादितच आले. शेलके घोडे व शेलके माणूस व शेलके हत्ती, शेलक्या सांडणी साठ कोश नित्य चालणार व शेलकें जवाहीर व शेलकी तरवार व शेलक्या तोफा वगैरे शेलकें साहित्य सोनपत पानपत कुंजपूर व दिल्ली वगैरे ठिकाणीं सर्वस्व बुडालें. कितीकांचीं घरें बसलीं. कितीकांच्या नकला[१३] जहाल्या. कितीक पुरुष शिपाई-गिरीचे अहंकारी ते बद्रिकाश्रमास वगैरे पवित्र जागां तपस्वी तपश्चर्येस गेले. कितीक हातापायांनीं अधू जहाले आणि भाऊबंद लढाईंत गर्क जहाले, आतां देशीं काय जावें, या कारणास्तव गंगाप्रवाहीं व यमुनाप्रवाहीं कितीकांनीं घालून घेतलें. कितीकांनीं राज्यलोभें प्रयागीं जाऊन करवत[१४] घेतले. कितीक आभर जहाले. कितीक दरिद्री जहाले. तें पत्रीं कोठवर लिहावें !

एकें बारनिस शत्रूकडील व श्रीमंतांकडील यीं[१६] उभयतांच्यीं[१६] दिनचर्येचें वर्तमान दफात्यास[१७] चिटणीसांनीं बार केली त्यांची संगत पाहून, कच्चा मजकूर सेवेशीं निवेदन करावयाकारितां यथामतीनें बखर सजवून सेवेशीं पाठविली आहे. शके[१८] १६८४ चित्रभानुनाम संवत्सरे माहे फाल्गुन शुद्ध ५ मंदवासर[१८] मुक्काम पुणें. मागून नवल विशेष वर्तमान होईल तें सेवेशीं सेवक निवेदन करतील.

---

१०. एकंदर=बिलकुल.

११. " ०आम्हो सर्वही लढाईस० " प्रत ३.

१२. 'यशधारी' प्र० १ व २. परंतु 'य' अक्षर 'अ' बद्दल चुकून पडलें असावें.

१३. नकला झाल्या=निर्वंश झाले.

१४. पुढील जन्मीं राज्य मिळावें एतदर्थ करवतानें आपलें शरीर कापविलें.

१५. 'नकला जाहल्या०' पासून तों या शब्दापर्यंत मजकूर प्र० ३ मध्यें नाहीं.

१६–१६. हे शब्द प्र० १।२ मध्यें नाहींत.

१७. दफातें=स्मरण वही. या वहींत ज्या ज्या गोष्टी घडतील त्या टिपून खेरीज पत्रें व इतर कागदही बार करून ठेवावयाचे.

१८–१८. याजबद्दल प्र० ३ मध्यें " शके १६८३ वृषानाम संवत्सरे फाल्गुन शु॥ ५ मंदवार " असें आहे. मागें उपोद्घातांत 'फाल्गुन शुद्ध १५ पौर्णिमा' असें आहे तें चुकीनें पडलें गेलें.

बहुत काय लिहिणें ! सेवकावर लोभाची वृद्धि दिवसेंदिवस निरंतर व्हावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. ही किंताबत.

पृष्ठ ४२ ओळ २१ टीप + यांत दर्शविलेला प्रत २ मधील मजकूर निराळाच आहे तो येणेंप्रमाणें:--

तिकडे अबदलीच्या पुत्राचें वर्तमान कीं, पुत्र अपमान होऊन सेनेचा पराभव केला. असें ऐकून दुर्घट दुःख प्राप्त झालें. ते समयीं पुत्रशोकाची ममता अतिशय दाटली. सद्गगित होऊन ह्मणों लागला जे, "आतां आम्हीं वांचून काय करावें ? आपण मरावें यांत उत्तम आहे." म्हणोन सक्रोध भरित होऊन परम प्रतापी रणरंगाचीं वस्त्रें शस्त्रें तरकस कमाना चढवून अंबारींत बसला, आणि माहुतास हुकूम फर्माविला जे, "हत्ती फौजेंत ढकलणें. मारतां मारतां मरावें." हा सिद्धांत, अबदल्ली आपलें मनांत करून गोटांतून शिलेपोस घेऊन पन्नास हजार फौजेनिशीं निघाला. त्या समयीं इराणी व मनसूर अल्ली वगैरे तेही लक्ष दीड लक्ष फौजेनिशीं निघाले. हें वर्तमान सदाशिवपंत व नामी नामी सरदार यांस कळलें. तेव्हां फौजेनिशीं माघारीं फिरले. फौज अगदीं जर्जर जहाली. प्रातःकाळापासून तासेपर्यंत संग्राम करून शिणोन गेले. सायंकाळ एक तास दिवस राहिला. अगदींच दिवसाचे उपवासी लोक व घोडीं शिणोन गेलीं. आणि अमित्र शत्रु तो इराणी माघारा फिरले. तेव्हां सदाशिवपंत सर्वांस बोलावून बोलले जे, "होणार तें बळोत्तर, तें कदापि सुटणार नाहीं. तदनुरूप घडून येतें. श्रीसांबाचे मर्जीस आलें असेल तें तसेंच घडून येईल. आतां यमाची चिठ्ठी घेऊन खांसा खिजमतगारच आला असा दिसतो. कांहीं घेऊन गेल्याशिवाय जात नाहीं. पुन्हा युद्ध [न] करितां गति नाहीं. तेव्हां मल्हारजी होळकर व जनकोजी शिंदे यांनीं विचार केला कीं, "आतां मागें न फिरावें. तो असा पाठीवर घेऊन गोटांत आणावा. आणि निशा समयीं निशाचर यांचा निःपात करावा." ते समयीं सदाशिवपंत भाऊ याणीं उत्तर दिलें जे, "होणार तें होतें त्यास इलाज नाहीं." सदाशिवपंत माघारे फिरले. आणि बोलिले कीं, पुन्हां तीन टोळ्या करणें. आणि युद्धास प्रवर्तोन, डावे बाजूस विश्वासराव, उजवे बाजूस जनकोजी शिंदे लहान थोर सरदार, मध्यभागीं सदाशिवपंत, पंचवीस हजार फौजेनिशीं किरीटीप्रमाणें सांवरून रणरंगधीर उभे राहिले. तों परम आ-

---

१९. इतकेंच तुटकें वाक्य प्रत १ मध्यें आहे यावरून प्रत कोणाची कधीं लिहिली वगैरे हकीगत दिली होती ती फाटून गेली असें होतें. प्र० २ कोणाची कोठें लिहिली वगैरे तिचे शेवटचा मजकूर उपोद्घातांत दिला आहेच.

२०. किती तासपर्यंत तो आंकडा गाळला असावा.

२१. मूळांत 'करीटी' आहे. किरीटी=अर्जुन.

वेळें इराणी व अबदल्लींनीं एकलक्ष पटाणांनिशीं विश्वासराव यांजवर चालून घेतलें. प्रथम तोफखान्यावरच आले. तोफखाना तयारच होता. त्याजवर पडले. तेथें मुख्य इब्रामखान यानें धीर धरून एकदांच तोफांची सरबत्ती केली. तेव्हां लष्कर धूम्रें करून आच्छादून गेलें. दोन हजार [२२]भांडीं व पंचवीस हजार जेजाला व हेकले व सुतारनाला व जंबुरे, पंचवीस हजार बाण व [२३]करोळींचा मार दुरस्ता निमिष न लागतां. एकाएकी केला आधीं गारदी शस्त्रसंधानीं चतुर, [२४]वावगा आवाज जाऊं द्यावयाचा नाहीं, भडामाराची सीमाच केली. परंतु तितका आगीचा मार घेऊन जिवाची आशा न बाळगितां तोफखान्यांत अबदल्ली सरमिसळ जाहले. तेथें इराणी कडील मातबर सरदार पडले. या शिवाय पठाण रोहिले यांसि गणित करितां वीस हजार तेथेंच ठार पडले. याजखेरीज दाहा हजार पठाण जखमी जाहला. तितक्यांसही आंग देऊन बहुत मारामारी केली. वीस हजार गारदी अगदीं मारून कत्तल केली. खासा इब्रामखान त्यांचा सरदार खासा ठार पडला. इराणीनें तोफखाना मागें टाकून विश्वासरावावर चालून आला. तों यशवंतराव पवार व मातबर सरदार यांनीं सतीचें वायन घेऊन म्हणों लागले कीं, "आतां कांहीं जीव वांचावयाची आशा नाहीं; मारून गर्द होऊन जावें." असा निश्चय करून आपले कबिले यांच्या समशेरी करून शाका[२५]प्रीय केल्या आणि नीटच पुढें चालले. एका [२६]आंगीं आले; कांहीं जिवाची तमा धरिली नाहीं. तीन चार घटका शस्त्रांचे खणखणाट जाहले. कोणी कोणास हटलें नाहीं. पुढील पाय पुढें, याप्रमाणें वीरश्रीच्या तवकें करून रक्तोदकें सुस्नात होऊन क्षत भूषणें परम भयानक शरीरें. शोभलीं. एक धारा तीर्थीं आ म चे नडले, एकशूरत्व करून विराले, एक मृत्युपंथास गेले, एक पायातळीं रगडिले, एकाचें शीर तुटून भूमीस पडले, एकाचीं उदरें विदारलीं, एक रणांगणीं मूर्छित पडले, असें युद्ध महाभारती हि रा णी व रं ना द करिते जाहले. वीर मारामार करून दमले. घेघे ह्या शब्दाची ध्वनि उठली. कर्ण बधिर जाहले. आपपारखी ओळख न राहिली. अगदीं गर्दी होऊन गेली. [२७]हणवंता प्रमाणें एका परीस एक झुंझों लागले. वीरां आंगीं वीरश्रीचा संचार होऊन सिंहनादें गर्जों लागले. दोहीं दळांत शस्त्रें एकवटलीं, दोन्ही दळांमध्यभागीं रक्तोदकाच्या नद्या वाहूं लागल्या. तेव्हां पिशाचसमुदाय

---

२२. भांडें=नलिकायंत्र. 'भांडयांत दारू थोडकी भरावी' ह्या श्लोकचरणांत ही हाच अर्थ आहे. तो 'मोरेश्वर' मात्र कोण तें समजत नाहीं.

२३. करोळे=घोडेस्वारांच्या बंदुकीचा मार.

२४. वावगा=फकट.

२५. भाजीचे तुकडे करतात तसे.

२६. एका आंगीं, एकांगी येणें=स्वतःच साहसानें पुढें जाणें.

२७. हणवत=हनूमान्=मारुती.

आनंदें करून नाचूं लागले कीं, " चौंरशें वर्षें झालीं. क्षुधातुर होतों. ते समयीं अठरा अक्षौणी दळांचें रक्तमांस भक्षिलें. त्या आलीकडे फार दिवस भोजन नाहीं. याजकारितां श्रीईश्वरानें आम्हांकारितां हें युद्ध निर्माण केलें." असें म्हणून भक्षावयास लागले. अशी युद्धाची सीमाच जाहली. फौजेचा मार वि[२९]—

२८. 'चारशें 'च कशीं ?

२९. इतकाच मजकूर एकुणपन्नासाव्या पृष्ठाच्या अर्धाच्या शेवटपर्यंत आला आहे- पुढें बंद किती होते तें खात्रीलायक कळत नाहीं, तरी १० एक असावे.